# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २११** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.०९/१२/२०२४ सोमवार रोजी दुपारी - ४.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३० चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.०९/१२/२०२४ सोमवार रोजी दुपारी - ४.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३० चे कार्यवृत्त कायम करणे.करणे.

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.०९/१२/२०२४ सोमवार रोजी दुपारी - ४.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३० चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०२** **प्रशासक ठराव क्र :-२१२** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. मुख्य लेखापरिक्षक, लेखापरिक्षण विभाग यांचेकडिल जा.क्र./जशमनपा/मुलेप/३१/२०२४ दि.३०/१२/२०२४
३. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२०/१२/२०२४ चा अभिप्राय
४. आयुक्त यांचा दि.२९/१२/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेचा सन २०१६/१७ ते २०१७/१८ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल महासभेपुढे ठेवणेबाबत.

---

वाचा क्र.१ व मुख्य लेखापरिक्षक, लेखापरिक्षण विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण, जिल्हा लेखापरिक्षा अधिकारी यांचे पथकाने दि.१७/०४/२०२३ ते दि.३०/०५/२०२४ या कालावधीत पुर्ण करुन तसा अहवाल लेखापरिक्षण विभागाकडेस आ.क्र./मुलेप/१६ दि.१७/१२/२०२४ अन्वये प्राप्त झालेला आहे.

सदर अहवालात एकुण १८७ आक्षेप नोंदविणेत आलेले असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०७ नूसार अहवाल मिळाल्याच्या दिनांका पासून तीन महिन्यांच्या आत असा लेखापरिक्षण अहवाल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे आवश्यक आहे. त्यानूसार सदरचा अहवालास मान्यता मिळण्यासाठी मुख्य लेखापरिक्षक, लेखापरिक्षण विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावातील वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार लेखा परिक्षण अहवालाची माहिती घेतली. लेखापरिक्षण विभागाने मुदतीत महानगरपालिकेतील संबंधित विभागांना त्यांचे संबंधीत आक्षेप पाठवुन व त्यांचेकडुन विहीत मुदतीत आक्षेपांचे अनुपालन प्राप्त करुन घेवुन अनुपालन स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालय, छत्रपती संभाजी नगर यांचेकडेस आक्षेप वगळणेकामी पाठविण्याची कार्यवाही करावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०३** **प्रशासक ठराव क्र :-२१३** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१७०२/२०२४-२५ दि.२७/१२/२०२४
३. सहाय्यक आयुक्त (बांधकाम) यांचा दि.३०/०७/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०६/०९/२०२४ चा अभिप्राय
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१६/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विशेष निधी अनुदाना अंतर्गत जळगांव प्रभाग क्रं.२८ स.नं.४३१ सागर पार्क जागेला चेनलिंग फेन्सिंग तयार करणे कामाची सुरक्षा अनामत परत करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विशेष निधी अनुदाना अंतर्गत जळगांव प्रभाग क्रं.२८ स.नं.४३१ सागर पार्क जागेला चेनलिंग फेन्सिंग तयार करणे कामी मक्तेदार श्री पदमालय कंन्स्ट्रक्शन यांची सुरक्षा अनामत (१) पावती क्रं.३५२३० दि.०३/०६/२०२० अन्वये रक्कम रु.७२,८५९/- मात्र (२) पावती क्रं.६४९१८ दि.२८/०६/२०२१ अन्वये रक्कम रु.७३,८९०/- मात्र अशी एकुण रक्कम रु.१,४६,७४९/- मात्र सुरक्षा अनामत म्हणुन अर्थ विभागात जमा असुन सदरचे काम पुर्ण होवून ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार यांनी वर नमुद प्रमाणे रक्कम रु.१,४६,७४९/- मात्र सुरक्षा अनामत म्हणुन जमा रक्कम परत मिळण्याची मनपा सा.बा.आ.क्रं.३६४४ दि.२०/१०/२०२३ अन्वये मागणी केलेली आहे. सदरच्या सुरक्षा अनामत रक्कमेला ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने अदायगी करता देय्यक सादर करण्याकामी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक -अ मध्ये उप विभाग २३ जानेवारी २०१३ चे पान नं.४३ प्रकरण २० मधील नियम क्रं.२९९ नुसार मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

शहर अभियंता यांनी वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०४** **प्रशासक ठराव क्र :-२१४** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१७०३/२०२४-२५ दि.२७/१२/२०२४
३. सहाय्यक आयुक्त (बांधकाम) यांचा दि.३०/०७/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०६/०९/२०२४ चा अभिप्राय
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१६/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विशेष निधी अनुदान विकास योजने अंतर्गत जळगांव प्रभाग क्रं.२८ स.नं.४३१ सागर पार्क जागेला चेनलिंग फेन्सिंग करणे कामाची परफार्मन्स सुरक्षा अनामत परत करणेबाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विशेष निधी अनुदान विकास योजने अंतर्गत जळगांव प्रभाग क्रं.२८ स.नं.४३१ सागर पार्क जागेला चेनलिंग फेन्सिंग करणे कामी मक्तेदार श्री पदमालय कंन्स्ट्रक्शन यांची परफार्मन्स सुरक्षा अनामत पावती क्रं.२४२९६ दि.०७/०८/२०१९ अन्वये रक्कम रु.१५,०२७/- मात्र परफार्मन्स सुरक्षा अनामत म्हणुन अर्थ विभागात जमा असुन सदरचे काम पुर्ण होवून ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार यांनी वर नमुद प्रमाणे रक्कम रु.१५,०२७/- मात्र परफार्मन्स सुरक्षा अनामत म्हणुन जमा रक्कम परत मिळण्याची मनपा सा.बा.आ.क्रं.३६४३ दि.२०/१०/२०२३ अन्वये मागणी केलेली आहे. सदरच्या परफार्मन्स सुरक्षा अनामत रक्कमेला ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने अदायगी करता देय्यक सादर करण्याकामी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक -अ मध्ये उप विभाग २३ जानेवारी २०१३ चे पान नं.४३ प्रकरण २० मधील नियम क्रं.२९९ नुसार मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

शहर अभियंता यांनी वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०५** **प्रशासक ठराव क्र :-२१५** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१७०४/२०२४-२५ दि.२७/१२/२०२४
३. सहाय्यक आयुक्त (बांधकाम) यांचा दि.३०/०७/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०६/०९/२०२४ चा अभिप्राय
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१६/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजने अंतर्गत शहराचा हरित क्षेत्र विकास प्रकल्पाच्या जागेस कंपाऊड चेनलिंग फेन्सिंग तयार करणेची कामे १४ वा वित्त आयोगा अंतर्गतच्या निधीतुन प्रभाग क्रं.०८ निमखेडी गट क्रं.११२ ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सिंग करणे कामाची परफार्मन्स सुरक्षा अनामत परत करणेबाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजने अंतर्गत शहराचा हरित क्षेत्र विकास प्रकल्पाच्या जागेस कंपाऊड चेनलिंग फेन्सिंग तयार करणेची कामे १४ वा वित्त आयोगा अंतर्गतच्या निधीतुन प्रभाग क्रं.०८ निमखेडी गट क्रं.११२ ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सिंग करणे कामी मक्तेदार श्री पदमालय कंन्स्ट्रक्शन यांची परफार्मन्स सुरक्षा अनामत पावती क्रं.२६९१२ दि.१८/०९/२०१९ अन्वये रक्कम रु.२०,८७४/- मात्र परफार्मन्स सुरक्षा अनामत म्हणुन अर्थ विभागात जमा असुन सदरचे काम पुर्ण होवून ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार यांनी वर नमुद प्रमाणे रक्कम रु.२०,८७४/- मात्र परफार्मन्स सुरक्षा अनामत म्हणुन जमा रक्कम परत मिळण्याची मनपा सा.बा.आ.क्रं.३६४५ दि.२०/१०/२०२३ अन्वये मागणी केलेली आहे. सदरच्या परफार्मन्स सुरक्षा अनामत रक्कमेला ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने अदायगी करता देय्यक सादर करण्याकामी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक -अ मध्ये उप विभाग २३ जानेवारी २०१३ चे पान नं.४३ प्रकरण २० मधील नियम क्रं.२९९ नुसार मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

शहर अभियंता यांनी वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०६** **प्रशासक ठराव क्र :-२१६** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१७०५/२०२४-२५ दि.२७/१२/२०२४
३. सहाय्यक आयुक्त (बांधकाम) यांचा दि.३०/०७/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०६/०९/२०२४ चा अभिप्राय
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१६/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजने अंतर्गत शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्पाच्या जागेस कंपाऊड चेनलिंग फेन्सिंग तयार करणेची कामे १४ वा वित्त आयोगा अंतर्गत निधीतुन प्रभाग क्रं.०८ निमखेडी गट क्रं.११२ ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सिंग करणे कामाची परफार्मन्स सुरक्षा अनामत परत करणेबाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजने अंतर्गत शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्पाच्या जागेस कंपाऊड चेनलिंग फेन्सिंग तयार करणेची कामे १४ वा वित्त आयोगा अंतर्गत निधीतुन प्रभाग क्रं.०८ निमखेडी गट क्रं.११२ ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सिंग करणे कामी मक्तेदार श्री पदमालय कंन्स्ट्रक्शन यांची सुरक्षा अनामत (१) पावती क्रं.३५२९९ दि.०९/०६/२०२० अन्वये रक्कम रु.८४,५०७/- मात्र (२) पावती क्रं.४४५८४ दि.०३/०२/२०२१ अन्वये रक्कम रु.९८३/-मात्र अशी एकुण रक्कम रु.८५,४९०/- मात्र सुरक्षा अनामत म्हणुन अर्थ विभागात जमा असुन सदरचे काम पुर्ण होवून ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार यांनी वर नमुद प्रमाणे रक्कम रु.८५,४९०/- मात्र सुरक्षा अनामत म्हणुन जमा रक्कम परत मिळण्याची मनपा सा.बा.आ.क्रं.३६४६ दि.२०/१०/२०२३ अन्वये मागणी केलेली आहे. सदरच्या सुरक्षा अनामत रक्कमेला ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने अदायगी करता देय्यक सादर करण्याकामी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक -अ मध्ये उप विभाग २३ जानेवारी २०१३ चे पान नं.४३ प्रकरण २० मधील नियम क्रं.२९९ नुसार मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

शहर अभियंता यांनी वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०७** **प्रशासक ठराव क्र :-२१७** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१७०६/२०२४-२५ दि.२७/१२/२०२४
३. सहाय्यक आयुक्त (बांधकाम) यांचा दि.२७/०८/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०८/०९/२०२४ चा अभिप्राय
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१६/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजने अंतर्गत (१) जळगांव स.नं.४९७ आरक्षण क्रं.२२ प्रजापत नगर रेल्वे लाईनला लागुन असलेल्या जागेत अमृत हरित क्षेत्र विकास कार्यकम अंतर्गत हरीत क्षेत्र विकसित करणे ऐवजी गट नं.५९ विदया विहार शिव कॉलनी पिंप्राळा (१६८५) २) गट नं.५४ पिंप्राळा (२१४६) अशा दोन जागेवर अमृत हरीत क्षेत्र विकास कार्यक्रमा अंतर्गत हरीत क्षेत्र विकसीत करणे कामाची सुरक्षा अनामत परत करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजने अंतर्गत (१) जळगांव स.नं.४९७ आरक्षण क्रं.२२ प्रजापत नगर रेल्वे लाईनला लागुन असलेल्या जागेत अमृत हरित क्षेत्र विकास कार्यकम अंतर्गत हरीत क्षेत्र विकसित करणे ऐवजी गट नं.५९ विदया विहार शिवकॉलनी पिंप्राळा (१६८५) २) गट नं.५४ पिंप्राळा (२१४६) अशा दोन जागेवर अमृत हरीत क्षेत्र विकास कार्यक्रमा अंतर्गत हरीत क्षेत्र विकसीत करणे कामी मक्तेदार श्री पदमालय कंन्स्ट्रक्शन यांची सुरक्षा अनामत पावती क्रं.३२८४० दि.२०/०४/२०२० अन्वये रक्कम रु.१०४२७३/- मात्र सुरक्षा अनामत म्हणुन अर्थ विभागात जमा असुन सदरचे काम पुर्ण होवून ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार यांनी वर नमुद प्रमाणे रक्कम रु.१०४२७३/- मात्र सुरक्षा अनामत म्हणुन जमा रक्कम परत मिळण्याची मनपा सा.बा.आ.क्रं.३६४२ दि.२०/१०/२०२३ अन्वये मागणी केलेली आहे. सदरच्या सुरक्षा अनामत रक्कमेला ०३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने अदायगी करता देय्यक सादर करण्याकामी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक -अ मध्ये उप विभाग २३ जानेवारी २०१३ चे पान नं.४३ प्रकरण २० मधील नियम क्रं.२९९ नुसार मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

शहर अभियंता यांनी वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०८** **प्रशासक ठराव क्र :-२१८** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१७२२/२०२४-२५ दि.०२/०१/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.१६/१२/२०२४ चा अभिप्राय
४. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.२६/१२/२०२४ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.२६/१२/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** मनपा निधी अंतर्गत महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजीनगर मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पूर्णाकृती पुतळा बसविण्यात येणार असुन तेथील पुर्वी असलेला छत्रपती महाराजांचा अर्धाकृती पुतळा म.से.संघ जळगांव शाखा येथे विनामुल्य स्वरुपात मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा, शिवाजी नगर मधील मनपा मालकीच्या शाळेच्या आवारातील जुना अर्धाकृती पुतळा काढुन त्या ठिकाणी अश्वारुढ पूर्णाकृती पुतळा उभारणे कामी चबुतरा तयार करणे कामी मक्तेदार श्री.निखील कृष्णराज पाटील यांना जा.क्रं./पवडी/४९/२४-२५ दि.२६/०९/२०२४ अन्वये कार्यादेश देण्यात आलेले आहे. सदर कार्यादेशानुसार काम सुरु करण्याकरीता प्रस्तावित पुतळयाच्या निहित जागेवर विदयमान अर्धाकृती पुतळा काढणे आवश्यक असल्याने सदर पुतळा काढण्याची मक्तेदार यांनी परवानगी अपेक्षिलेली आहे.

उपरोक्त कार्यादेशानुसार महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पूर्णाकृती पुतळा उभारणे कामी चबुतरा तयार करणे कामी विदयमान अर्धाकृती पुतळा काढणे आवश्यक असल्याने तसेच आयुक्त यांचे आदेशानुसार नवीन पुतळयाची पाहणी केली असता पुतळयाचे जवळपास ९०% काम पुर्ण झालेले असल्याबाबत वास्तुविशारद विशाल भरत देशमुख यांनी दि.०९/१२/२०२४ रोजीच्या पत्राव्दारे अभिप्राय दिलेले आहे. त्यानुसार उपरोक्त कामी वरील प्रमाणे दिलेल्या कार्यादेशानुसार विहित मुदतीत काम पुर्ण करणे आवश्यक असल्याने प्रस्तावित पुतळयाच्या निहित जागेवर विदयमान अर्धाकृती पुतळा विधीवत काढण्याची मक्तेदार यांना मंजुरी देण्यास मान्यता मिळावी.

तसेच विदयमान अर्धाकृती पुतळा काढल्यानंतर निवृत्ती नगर गट नं.२७ येथे बंदिस्त अश्या हॉल मध्ये पुर्ण सुरक्षेसह पुतळयाचे मांगल्य राखुन संस्थेच्या सर्व जबाबदारीवर स्थापन करण्यासाठी महाराजांचा अर्धाकृती पुतळा विनामुल्य ताब्यात मिळणे बाबत मराठा सेवा संघ महाराष्ट्र यांचा दि.११/१२/२०२४ चा अर्जानूसार मागणी केली आहे. त्यानुसार महाराजांचा अर्धाकृती पुतळा मराठा सेवा संघ,महाराष्ट्र यांचे ताब्यात देणे बाबत खालील अटी शर्तीनुसार मान्यता मिळावी.

अटी व शर्ती :-

१. छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धाकृती पुतळा ताब्यात मिळाल्यावर उपरोक्त जागी स्थापन करणेपुर्वी आवश्यक ती परवानगी घेणे संस्थेस बंधनकारक राहील.
२. सदर कामी मनपा कडुन कुठलाही खर्च देयक होणार नाही अथवा मागणी करता येणार नाही.
३. शासनाच्या नियमानुसार पुतळयाचे मांगल्य राखुन देखभाल करणे बंधनकारक राहील.

४. छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धाकृती पुतळयाचे पावित्र्य, मांगल्य, देखभाल, व्यवस्था व दुरुस्तीची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

५. पुतळा स्थापने करीता आवश्यक अश्या सर्व परवानग्या संस्थेने प्राप्त करुन घ्याव्यात.

६. प्रस्तुत कामासाठी लागणारा सर्व प्रकारचा खर्च संस्थेने करावयाचा असुन त्याचा कोणताही मोबदला आता व पुढे मनपाकडे भविष्यात मागणी करता येणार नाही.

७. पुतळयाबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत निर्माण झाल्यास आपली मागणी रद्द करणेत येईल.

८. पुतळयाचे अधिग्रहण बाबत रक्कम रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर संस्थेने लेखी संमतीपत्र अटी व शर्तीसह सादर करावे.

उपरोक्त अटीशर्ती नुसार छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धाकृती पुतळा मराठा सेवा संघ,महाराष्ट्र यांचा दि.११/१२/२०२४ चा अर्जानुसार मराठा महासंघाने मागणीपत्रात नमुद केल्यानुसार संस्थेस छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धाकृती अस्तीत्वातील पुतळा विना मुल्य वरील अटीशर्तीस बंधनकारक राहुन देणेस मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

शहर अभियंता यांनी वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०९** **प्रशासक ठराव क्र :-२१९** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१७३८/२०२४-२५ दि.०२/०१/२०२५
३. सहायक संचालक,नगररचना यांचा दि.१८/१२/२०२४ चा अभिप्राय
४. शाखा अभियंता,(पर्यावरण विभाग) यांचा दि.२६/१२/२०२४ चा अभिप्राय
५. शहर अभियंता यांचा दि.२६/१२/२०२४ चा अभिप्राय
६. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.२७/१२/२०२४ चा अभिप्राय
७. आयुक्त यांचा दि.३१/१२/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत रस्त्यांचे डिव्हाईडर व चौक खाजगी संस्था/ सेवाभावी संस्थांमार्फत विकसीत करुन सुशोभिकरण करणेस मान्यता देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ७ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत रस्त्यांचे डिव्हाईडर व चौक खाजगी संस्था/ सेवाभावी संस्थांमार्फत विकसीत करुन सुशोभिकरण करणे व करारनामा कालावधी पर्यंत सदर जागेचा वापर जाहीराती करीता करता येईल या प्रमाणे यापुर्वी महासभा ठराव क्रं.४२६ दि.३०/०३/२०१६ अन्वये ठराव पारीत करण्यात आलेला आहे तसेच महासभा ठराव क्रं.९५७ दि.२३/१२/२०२२ अन्वये सुध्दा रस्त्याचे डिव्हायडर व चौक हे खाजगी संस्था, उदयोजक, व्यापारी संस्था यांचे मार्फत सुशोभिकरण करणे व देखभाल व दुरुस्ती बाबत निविदा मागविणे करीता स्थानिक पातळीवर जाहिर सुचना प्रसिध्द करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त ठराव पारीत होण्यापुर्वी शहरातील काही चौक खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे खाजगी प्रतिष्ठानांना सुशोभित करण्याकरीता व विकसीत करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. त्यांची सदयास्थिती खालील प्रमाणे

| अ.क्रं. | विकासकाचे नांव | ठिकाण | करारनामा मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | ओरिऐंन्ट सिमेंट | नेहरु चौक डिव्हायडर | दि.०७/०१/२०२३ पर्यंत | विकसीत/देखभाल नाही |
| २ | भंगाळे गोल्ड प्रा.लि. | नविन बस स्टॅंड समोर डिव्हायडर | मुदत संपलेली आहे. | अविकसीत |
| ३ | महावीर ज्वेलर्स | नविपेठ चौक डिव्हायडर | दि.१३/०५/२०२१ पर्यंत | विकसीत |
| ४ | वासुकमल बिल्डकॉन | चित्राचौक ते जैन मंदीर डिव्हायडर | मुदत संपलेली आहे | विकसीत/देखभाल नाही |
| ५ | ॲक्सीस बॅंक | मोरोको हॉटेल ते रेस्ट हाऊस | -- | अर्ध- विकसीत/देखभाल नाही |
| ६ | आर सी बाफना ज्वेलर्स | शास्त्री टॉवर चौक व डिव्हायडर | -- | विकसीत |

उपरोक्त तक्त्यातील अ.क्रं.०२ व ०४ यांच्या करारनाम्याच्या मुदत संपलेल्या आहेत. अ.क्रं.०६ यांनी शास्त्री टॉवर चौक विकसीत केलेला आहे. अ.क्रं.०१ व ०५ यांनी विकसीत केलेला आहे. परंतु देखभाल व दुरुस्ती केलेली दिसुन येत नाही.

आयुक्त यांचेकडील आदेश क्रं.आ.का/२३२ दि.१५/०४/२०२४ अन्वये शहरातील चौक व डिव्हायडर सुशोभित करणे करीता खाजगी प्रतिष्ठांनांकडुन प्रस्ताव मागवुन अहवाल सादर करणे बाबत निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने प्रदीप अहुजा (रॉयल पॅलेस हॉटेल) यांनी दि.२६/०२/२०२४ रोजीच्या अर्जानुसार आकाशवाणी चौक ते काव्यरत्नावली चौक

दरम्यानचा डिव्हायडर विकसीत व सुशोभिकरण करण्यासाठी उपलब्ध करुन देणे बाबत विनंती केली आहे. तसेच दि.०४/१२/२०२४ रोजी च्या पत्रानुसार सुध्दा वरील डिव्हायडर सुशोभिकरण करणे करीता मंजुरी मिळावी या प्रमाणे विनंती केली आहे. तसेच प्रस्तुत पत्रात प्रत्यक्ष झालेल्या मिटींग मध्ये ठरल्यानुसार ६० टक्के त्यांची जाहिरात व ४० टक्के जाहिरात सार्वजनिक स्वरुपाची या प्रमाणे करण्यास तयार असले बाबत नमुद केले आहे. तरी अर्जदार यांचे विनंती नुसार अर्जदार यांना प्रायोजिक तत्वावर दुभाजक विकसीत करणेस सुशोभिकरण करणे व जाहिरात लावणेस खालील अटी शर्तीसह परवानगी देता येईल.

१. दुभाजक अथवा चौक विकसीत व सुशोभिकरण करण्यापुर्वी सुशोभिकरण चे डिझाईन प्रथमत: संबंधीत विभागाकडुन मान्य करुन घेतल्यानंतर कामास सुरुवात करता येईल.
२. चौक /डिव्हायडर हे विकसीत केल्यानंतर व सुशोभिकरणा नंतरही सदर जागेची मालकी महानगरपालिकेचीच राहिल.
३. सदर दुभाजक विकसीत व सुभोभिकरण केल्यानंतर या दुभाजकाचा वापर फक्त संबंधित प्रतिष्ठानाच्या व त्यांच्या उत्पादनाच्या जाहिराती करीता करता येईल या व्यतिरीक्त अन्य कोणतीही संस्था/ प्रतिष्ठाण अथवा त्यांच्या उत्पादनाच्या जाहिराती करीता वापर करता येणार नाही तसेच या दुभाजकाचा उपयोग कोणत्याही प्रकारे आर्थिक लाभ होण्याकरीता करता येणार नाही.
४. रस्ता दुभाजकावर/चौकात संस्थेची जाहिरात करण्याचा अधिकार चौक/दुभाजक विकसित करणाऱ्या विकासकाचाच राहिल व त्यासाठी मनपा मार्फत शुल्क आकारणी करण्यात येणार नाही. करारनामा कालावधीपर्यंत चौकाचे जागेत दुभाजकावर जाहिरात करण्याचा अधिकार चौक/ डिव्हायडर विकासकाचाच राहिल.
५. दुभाजकात लावण्यात येणाऱ्या जाहिरातीमुळे त्यांचे फलक, बोर्ड होर्डींग याच्या मुळे रहदारीस कोणतीही अडचण होणार नाही किंवा वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होणार नाही या प्रमाणे जाहिराती लावणे बंधनकारक राहिल.
६. सदर दुभाजकात करावयाच्या जाहिरातीच्या प्रमाणात आपल्या प्रतिष्ठानच्या अथवा उत्पादनाच्या जाहिरातीचे प्रमाण ६० टक्के व महानगरपालिके करीता सार्वजनिक जाहिरातीचे प्रमाण ४० टक्के राहिल महानगरपालिकेतर्फे करावयाच्या जाहिरातीची व्यवस्था विकासक यांना करावी लागेल.
७. सदर करारनाम्याची मुदत ही करारनामा करुन दिल्यापासुन ०५ वर्षापर्यंत राहिल त्या नंतर मनपा मार्फत धोरण निश्चिती नुसार निर्णय घेण्याचा संपुर्ण अधिकार हा महानगरपालिकेचा राहिल व तो विकासकास देखिल बंधनकारक राहिल.
८. सदर रस्ता दुभाजक टाकणे सुशोभिकरण करणे व चौक विकसीत करणेस येणारा संपुर्ण खर्च संस्था/ विकासकास करावयाचा आहे व त्या बाबत मनपाकडे कोणताही मोबदला मागता येणार नाही.
९. महानगरपालिकेस आवश्यकता भासल्यास धोरणात्मक बदल करण्याचा संपुर्ण अधिकार राहिल व त्या बाबत विकासकास कोणताही न्यायालयीन वाद उपस्थित करता येणार नाही.
१०. सदर रस्ता दुभाजक सुशोभिकरण/चौकाची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी विकासकाची राहिल.

उपरोक्त प्रमाणे अहवाल अटी व शर्ती नुसार दुभाजक विकसीत करणे करीता उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त वाचा क्र.१ ते ७ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रस्तावातील रस्त्यांचे डिव्हायडर व चौक विकसित करुन सुशोभिकरण करणे कामी प्रमुख दैनिकात जाहिरात प्रसिध्द करुन उदयोजक, व्यापारी व खाजगी संस्था यांचेकडुन EOI मागवुन विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

शहर अभियंता यांनी वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- १०** **प्रशासक ठराव क्र :-२२०** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१७६३/२०२४-२५ दि.०८/०१/२०२५
३. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०७/०१/२०२५ चा अभिप्राय
४. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.०७/०१/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.०८/०१/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव अंतर्गत बांधकाम विभागाकडेस मनुष्यबळ कमी असल्याने दैनंदिन रस्त्यांची डागडुजी, वेस्ट मटेरियल, कच्या चाऱ्या खोदणे, रोड क्रॉसिंगला पाईप टाकणे इत्यादी कामासाठी लागणारे ४१ मजुर पुरवठा करणे कामी ई-निविदा मागविणे व येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिकेच्या विविध प्रभागातील शाखा अभियंता यांच्या अधिपत्याखालील मनपा ट्रॅक्टर वाहनांवर दैनंदिन कामे करण्या करीता मजुरांची आवश्यकता आहे. तसेच खात्या मार्फत शहरातील रस्त्यांच्या डागडुजी करीता असलेल्या ट्रॅक्टर वाहनांवर देखील मजुरांची आवश्यकता आहे. या पूर्वी मक्तेदारा मार्फत प्रत्यक ट्रॅक्टरवर ०३ मजुर या प्रमाणे एकुण ३३ मजुर पुरवठा करण्याचे कार्यादेश देवुन काम करण्यात येत आहे. या कार्यादेशाची मुदत संपत असल्याने पुढील एक वर्षाच्या कालावधी करीता मजुर पुरवठा करण्याच्या कामाचे जाहिर निविदाव्दारे कार्यवाही करुन काम करणे आवश्यक आहे. मनपातील अनेक विभागातील कर्मचारी सेवा निवृत्त झाल्याने दैनंदिन कामे करणे, नागरिकांना आवश्यक सुविधा पुरविणे, शहरातील वेस्ट मटेरिअल उचलणे, झाडांच्या फांदया उचलणे, कच्या चाऱ्या करणे, रोड क्रॉसिंगला पाईप टाकणे इ. कामे याच मजुरांकडुन करुन घेण्यात येत असतात. या कामी पुढील एक वर्षाच्या कालावधी करीता आवश्यक असलेल्या मजुरांचा तपशिल खालील प्रमाणे.

विविध प्रभागातील शाखा अभियंता यांच्या अधिपत्या खालील असलेल्या एकुण ०८ ट्रॅक्टरवर प्रति ट्रॅक्टरवर ०४ मजुर या प्रमाणे ३२ मजुर व खात्या मार्फत रस्ते दुरुस्ती कामी असलेल्या तीन ट्रॅक्टरवर प्रति ट्रॅक्टरवर ०३ मजुर या प्रमाणे ०९ मजुर असे एकुण ४१ मजुरांची आवश्यकता आहे.

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, ई ब्लॉक सी-२०, वांद्रे-कुर्ला संकुल वांद्रे(पू) मुंबई ४०००५१ दि.०६/०८/२०२४ चे परिपत्रकानूसार किमान वेतन परिमंडळ (महापालिका) अन्वये वेतनदरानुसार खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

४१ मजुर x ३६५ दिवस x ६४४.४६ रु. प्रति दिवस = ९६,४४,३४३.९० + १८% GST रु.१७,३५,९८१.९० = १,१३,८०,३२५/- म्हणजेच १,१३,८०,३२५/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरच्या खर्चास मान्यता मिळण्यास व सदर कामास व त्यासाठी येणारा खर्च रक्कम रु.१,१३,८०,३२५/- मात्र सन २०२४-२५ या आर्थीक वर्षाच्या अर्थसंकल्पातील मनपा निधीतुन रस्ते व्यवस्था व दुरुस्ती या शिर्षा अंतर्गत करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेस तसेच प्रस्तुत प्रकरणी मनपा ट्रॅक्टर वाहनांवर दैनंदिन कामे करण्याकरीता तसेच खात्यामार्फत रस्ते दुरुस्तीची कामे करणे व मजुर पुरविणे करीता, येणारा खर्च रक्कम रु.१,१३,८०,३२५/- चे खर्चास मनपा निधी अंतर्गत रस्ते व्यवस्था व दुरुस्ती लेखाशिर्ष अंतर्गत सन २०२४-२५ चे आर्थिक वर्षात प्रस्तावीत करण्यात येत आहे. प्रस्तृत खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे

करीता तसेच सदर कामाची निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. उपरोक्त कामी मक्तेदारास ११ महिने कालावधी करीता मजुर पुरवठा करण्याचे कामाचा मक्ता देण्यात यावा व त्यानूसार जाहिर निविदा प्रसिध्द करुन पूढील नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

शहर अभियंता यांनी वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- ११** **प्रशासक ठराव क्र :-२२१** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचेकडिल जा.क्र./२८६७ दि.०८/०१/२०२५
३. उपायुक्त (सा.प्र.) यांचा दि.३१/१२/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०६/०१/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.०७/०१/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** शासन निर्णयाचे अनुषंगाने महिला व बालकल्याणाच्या संबंधित उपक्रम/ योजना राबविणे कामी सन २०२३-२४ करिता १ ते २३ योजना राबविणेस मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार योजना क्र.१३ मधील क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंना अर्थसहाय्य लाभ देणे बाबत. त्याप्रस्तुत प्रकरणाचे अनुषंगाने पुरस्कार निवड समितीच्या दि.१५/१०/२०२४, दि.२८/११/२०२४, दि.१०/१२/२०२४, दि.१६/१२/२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील इतिवृत्ताचे अनुषंगाने योजना क्र.१३ मधील श्रेणीनिहाय प्रपत्र A B C D मधील पात्र होत असलेल्या एकुण ७२ क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंना लाभ देणेस तसेच प्रपत्र E मध्ये पुरुष खेळाडू असल्याने ३१ पुरुष खेळाडूंचे अर्ज योजनेतील निकषानुसार व प्रपत्र F मध्ये दर्शविण्यात आलेल्या विजेत्या महिला खेळाडू या योजनेच्या लाभार्थी निवडीच्या निकषात बसत नसल्याने (विना अनुदानित खेळ, म.न.पा. क्षेत्राबाहेरील, स्पर्धेचा कालावधी, असोसिएशन मार्फत व फेडरेशन मार्फत खेळ खेळलेले इत्यादी खेळाडु अर्जदार) यांना पुरस्कार निवड समितीच्या बैठकीतील इतिवृत्ताचे अनुषंगाने अपात्र करण्यास व त्याकरिता इतिवृत्तांच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय महिला विजेत्या खेळाडुंच्या संख्या लक्षात घेऊन योजनेच्या श्रेणीत व लक्षांकात, धोरणात, कार्यपध्दतीत व नियमावलीत त्याप्रमाणे बदल करणेस तसेच खर्च मर्यादा जास्त होत असल्याने योजना क्र.१३ मधील सदर योजनेवरील खर्च मर्यादा वाढविणेस व त्यानुसार पात्र लाभार्थीसाठी लागणारा अपेक्षित खर्च रक्कम रु.२०,८०,०००/- इतका खर्च सन २०२४-२५ चे अंदाजपत्रकीय लेखाशिर्षकाच्या महिला व बालकल्याण करिताचे राखीव निधीमधुन खर्च करणेस मान्यता प्रदान करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

शासन निर्णय क्र.जी.ई.एन.-१०९३/१९९२/नवि-१४ दि.३०/०६/१९९२ तसेच शासन निर्णय एस.यु.एन./२०६१/ प्र.क्र.३८५/नवि-१७ दि.२९/०३/२०२२ नुसार महिला व बालकल्याण यासाठी महानगरपालिकेच्या वार्षिक उत्पन्नापैकी बांधिल खर्च वजा जाता राहिलेल्या निव्वळ महसुलातील ५% राखीव तरतुदीमधुन महिला व बालकल्याण याकरिता असलेल्या योजना/ कार्यक्रम/ कामे राबविणेस शासनाने मान्यता दिलेली आहे.

सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने महिला व बालकल्याणाच्या संबंधित उपक्रम/ योजना राबविणे कामी महासभा ठराव क्र.११७२ दि.१७/०७/२०२३ अन्वये सन २०२३-२४ करिता महिला व बालकल्याणाच्या संबंधित १ ते २३ योजना / उपक्रम यांची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आलेली होती. जळगांव महानगरपालिका बालकल्याणाच्या संबंधित उपक्रम/ योजना अंतर्गत योजना क्रं.४ शिष्यवृत्ती योजना, योजना क्र.१२ गुणवंत विदयार्थीनी गुणगौरव योजना, योजना क्र.१३ क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंना अर्थसहाय्य इत्यादी योजनांचा लाभ देणे संदर्भात दि.१९/०६/२०२३ रोजी जळगांव शहरातील स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन दि.०५/०८/२०२३ पावेतो विहित नमुन्यात आवश्यक त्या कागदपत्रांसह म.न.पा. प्रशासनाकडुन अर्ज मागविण्यात आलेले होते.

- योजना क्र.१३ क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंना अर्थसहाय्य :-

योजनेचा उद्देश, लाभार्थी निवडीचे निकष, लाभ वाटपाची कार्यपध्दती -

शासनाकडून/ विदयापिठस्तरीय, जिल्हास्तर, राज्यस्तर, राष्ट्रीय स्तर व आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिलांना अधिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने त्यांना पुरस्कार देणे.

सदर योजनेच्या अनुषंगाने स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून ज्या महिला खेळाडूंनी शासनाकडून विदयापीठस्तरीय, जिल्हास्तर, राज्यस्तर, राष्ट्रीय स्तर व आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळविलेले आहे. अशा महिला खेळाडूंकडून अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती मागवून मुदतीत प्राप्त होणाऱ्या अर्जांपैकी पात्र महिला खेळाडूंना खालील प्रमाणे लाभाची रक्कम (DBT) व्दारे बँक खात्यावर जमा करुन लाभ देणे.

योजनेच्या लाभ निवडीचे निकष व लाभ वाटपाची कार्यपध्दती :-

जळगांव शहरातील मागील १० वर्षापासुन पुरावा, स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र, जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे प्रमाणपत्र, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.

खालील सर्व श्रेणींकरीता सदर लाभ प्राप्त पदकानुसार लाभार्थ्यास एकदाच देण्यात येईल.

लाभाचे स्वरुप :-

| श्रेणी | प्राविण्याचा प्रकार | लाभाची रक्कम |
|---|---|---|
| जिल्हास्तरीय खेळाडू (लक्षांक ५) | सुवर्ण पदक | रु.१०,०००/- |
| | रजत पदक | रु.५,०००/- |
| | कास्य पदक | रु.३,०००/- |
| राज्यस्तरीय खेळाडू (लक्षांक ३) | सुवर्ण पदक | रु.७५,०००/- |
| | रजत पदक | रु.५०,०००/- |
| | कास्य पदक | रु.२५,०००/- |
| राष्ट्रीय खेळाडू (लक्षांक २) | सुवर्ण पदक | रु.१,००,०००/- |
| | रजत पदक | रु.७५,०००/- |
| | कास्य पदक | रु.५०,०००/- |
| आंतरराष्ट्रीय खेळाडू | सुवर्ण पदक, रजत पदक, कास्य पदक | रु.२,००,०००/- |

योजना क्र.१३ नुसार क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंना अर्थसहाय्य देणे संदर्भात या योजनेकरीता श्रेणीनिहाय जिल्हास्तरीय खेळाडू (लक्षांक ५), राज्यस्तरीय खेळाडू (लक्षांक ३), राष्ट्रीय खेळाडू (लक्षांक २), आंतरराष्ट्रीय खेळाडू इत्यादींसाठी जळगांव महानगरपालिकेकडेस एकुण १६३ प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन पात्र व अपात्र खेळाडूंची यादी तयार करुन मिळणे करिता त्याबाबतचे पत्र महानगरपालिका प्रशासनाने जिल्हा क्रीडा अधिकारी,जळगांव जिल्हा क्रीडा संकुल यांचेकडे क्र.जा.क्र./म.बा.क./२०६८/२०२३ दि.२०/११/२०२३, जा.क्र./म.बा.क./३२/२०२४ दि.५/१/२०२४, जा.क्र./म.बा.क./५८/२०२४ दि.२७/०३/२०२४, जा.क्र./म.बा.क./१९२०/२०२४ दि.११/०९/२०२४, जा.क्र./म.बा.क./२१८८/२०२४ दि.७/१०/२०२४ चे पत्र पाठविणेत आलेले होते.

त्या अनुषंगाने जिल्हा क्रीडा अधिकारी,जळगांव यांनी इकडील जा.क्र./म.बा.क./२१८८/२०२४ दि.७/१०/२०२४ नुसार या कार्यालयाकडे १६३ प्रस्तावांचे प्राप्त अर्जासोबत क्रीडा प्रमाणपत्राची छाननी केलेली असल्याबाबत त्याचा अहवाल यादीसह सोबत जोडलेला असलेबाबतचे पत्र जा.क्र./डी.एस.ओ./जे.एम.सी./ए.डब्यु.डी./२०२४-२५/६३० दि.०९/१०/२०२४ रोजीचे इकडील कार्यालयाकडे दि.१०/१०/२०२४ रोजी प्राप्त झालेले आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी,जळगांव यांनी त्यांचे पत्रात पुढील बाबी निर्देशित केलेल्या असून त्या पुढील प्रमाणे अनुक्रमित असे :-

- काही खेळाडूंनी संघटनेव्दारा आयोजित फेडरेशन कप स्पर्धाचीही प्रमाणपत्रे जोडलेली आहे. * केंद्रीय विदयालय संघटन व CBSE बोर्डव्दारा आयोजित स्पर्धांबाबत निर्णय घ्यावा. * एका खेळाडूने एका पेक्षा अधिक वेळा अर्ज सादर केलेला आहे किंवा एकाच अर्जाला एकापेक्षा जास्त क्रीडा प्रमाणपत्र जोडलेली आहेत. त्याबाबत निर्णय घ्यावा. * शालेय क्रीडा स्पर्धेत विभागस्तरावरील प्रमाणपत्रे सादर केलेल्या खेळाडूंबाबत निर्णय घ्यावा. * इतक्या कमी वेळेत कोणत्या स्पर्धा अधिकृत आहेत याची पडताळणी शक्य नसल्याने सर्व अर्जांसह जोडलेल्या क्रीडा

प्रमाणपत्रांची केवळ प्राथमिक छानना करण्यात आलेली आहे. यापुढे सदर योजनेच्या अनुषंगाने पुरस्कारार्थी निवड करण्यासाठी आपलेस्तरावर छाननी समिती गठित करावी असे मत आहे.

त्याकरिता प्रस्तुत प्रकरणी जिल्हा क्रीडा अधिकारी,जळगांव यांचे पत्रातील नमुद केलेल्या निर्देशित बाबी विचारात घेता सदर योजनेच्या अनुषंगाने पुरस्कारार्थी निवड करण्यासाठी पुरस्कार निवड व छाननी समिती गठित करणे बाबत जा.क्र./आ.का./२३१८/दि.१४/१०/२०२४ रोजी म.न.पा. प्रशासनाने त्याकरीता आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली उक्त प्रस्तुत प्रकरणी, उपायुक्त (सा.क.), जिल्हा क्रीडा अधिकारी,जळगांव या कार्यालयाकडील जिल्हा क्रीडा अधिकारी, प्रशासन अधिकारी, म.न.पा. शिक्षण विभाग, म.न.पा.क्रीडा अधिकारी तसेच अधिक्षक महिला बालकल्याण विभाग यांची समिती गठित केली असून त्या समिती गठण आदेशाची प्रत प्रकरणी संलग्न आहे. सन २०२३-२४ करिताचे योजना क्रं.१३ करिता क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंना अर्थसहाय्य लाभ देणे कामी पुरस्कारार्थी निवड करण्यासाठी पुरस्कार निवड समितीची प्रथम बैठक ही अध्यक्ष पुरस्कार निवड समिती,जळगांव म.न.पा. यांचे अध्यक्षतेखाली जा.क्र./२३१९ दि.१४/१०/२०२४ अन्वये दि.१५/१०/२०२४ व जा.क्र.आका/२५२७ दि.२७/११/२०२४ अन्वये अंतिम बैठक दि.२८/११/२०२४ रोजी दुपारी १२:३० वाजता आयुक्त यांचे दालनात घेण्यात आली होती.

प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने पुरस्कार निवड व छाननी समितीचे दिनांक १५/१०/२०२४ रोजी झालेल्या समितीचे बैठकीत खालील श्रेणीनिहाय महिला खेळाडूंचे अर्ज योजनेच्या लाभार्थी निवडीचे निकषानुसार कागदपत्रांची पडताळणीचे अनुषंगाने पात्र करण्यात आले आहे. ते अनुक्रमे अनुक्रमांक १ ते ४ वर दर्शविण्यात आलेले आहेत. व पुरुष खेळाडूंचे व इतर खेळाडूंचे सदर योजनेसाठी प्राप्त झालेले अर्ज हे योजनेच्या लाभार्थी निवडीचे निकषानुसार व स्वरुपानुरुप येत नसलेले अपात्र (बाद) करण्यात आलेले आहे. ते अनुक्रमे अनुक्रमांक ५ ते ६ वर दर्शविण्यात आलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हास्तरीय खेळाडू+ विभागीय स्तर खेळाडू- ३३+६ = एकुण ३९ अर्ज. | एकुण ७२ महिला खेळाडूंचे पात्र होत असलेले अर्ज |
| २ | राज्यस्तर राज्यस्तरीय खेळाडू - २४ अर्ज. | |
| ३ | राष्ट्रीय खेळाडू - ०८ अर्ज | |
| ४ | आंतरराष्ट्रीय स्तरीय खेळाडू - ०१ अर्ज | |
| ५ | पुरुष खेळाडू-२९ अर्ज व तसेच एकाच पुरुष खेळाडूच्या अर्जावर दुसऱ्या पुरुष खेळाडूचे अर्ज-२=३१ अर्ज (बाद) अपात्र | |
| ६ | योजनेच्या लाभार्थी निवडीच्या निकषानुसार व स्वरुपानुसार बसत नसलेले एकुण ६० अर्ज हे महिला खेळाडूंचे अर्ज (बाद) अपात्र | |

सदरचे प्राथमिक बैठकीत क्रीडा स्पर्धेकरीता विजेत्या महिला खेळाडूंचे सन २०२३-२४ करीता प्राप्त झालेले अर्जानुसार जिल्हास्तर, विभागस्तर, राज्यस्तर, राष्ट्रीय स्तर, आंतरराष्ट्रीय स्तर या स्तरावरील खेळाडूंच्या नावाचे अर्ज योजना क्र.१३ नुसार लाभार्थीचे निवडीचे निकषानुसार व स्वरुपानुरुप पडताळणी करुन पात्र व अपात्रतेच्या अर्जाची प्रक्रिया याव्दारे ती पुर्ण करण्यात आलेली होती. परंतु समितीचे प्राथमिक बैठकीत योजनेच्या लाभार्थी निवडीचे निकषानुसार व स्वरुपानुरुप पात्र असलेल्या महिला खेळाडू ह्या कोणत्या प्रकारच्या प्राविण्य प्रकाराचे लाभासाठी पात्र ठरत आहे (सुवर्णपदक, रजत पदक, कास्यपदक) याबाबत अंतिम निर्णय घेणे संदर्भात पुरस्कारार्थींची निवड करणेसाठी सदर पुरस्कार निवड समितीची अंतिम बैठक दिनांक २८/११/२०२४ रोजी दुपारी १२:३० वाजता आयुक्त यांचे दालनात अध्यक्ष पुरस्कार निवड समिती यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली होती.

त्यानुसार मागील बैठकीतील चर्चेनुसार व जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी सुचविलेल्या बाबींचा विचार करुन पुरस्कार निवड समितीचे अंतिम बैठकीत योजना क्र.१३ नुसार श्रेणीनिहाय क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंची संख्या व त्यांना देण्यात येणारा प्राविण्य प्रकाराच्या लाभाची रक्कम तसेच सर्व श्रेणींकरिता लागणारा आवश्यक निधी दर्शविणारा तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे अनुक्रमित असे.

जिल्हा क्रीडा अधिकारी,जळगांव यांनी जा.क्र.पत्र क्र.D.S.O./JMC/AWD/२०२४-२५/६३० दि.०९/१०/२०२४ अन्वये म.न.पा. प्रशासनास काही बाबी निर्देशित करुन प्राथमिक अहवाल पत्रासोबत पाठविलेला होता तो यापूर्वीच प्रशासनाने महिला व बालकल्याण विभागाकडे कार्यवाहीसाठी निर्देशित करुन पाठविलेला आहे. तो यापूर्वीच आपले प्रस्तुत प्रकरणी संलग्नित केलेला आहेच.

| अ.क्र. | श्रेणी | एकुण प्राप्त अर्ज | एकुण अपात्र अर्ज | एकुण पात्र अर्ज | पात्र अर्जापैकी प्राविण्य प्रकार निहाय वर्गवारी | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सुवर्ण पदक | रजत पदक | कास्य पदक | |
| १ | जिल्हास्तरीय खेळाडू+विभागस्तर | ४३ | ०४ | ३९ | २४ | १० | ०५ | |
| २ | राज्यस्तरीय खेळाडू | ३९ | १५ | २४ | ०१ | १४ | ०९ | |
| ३ | राष्ट्रीय खेळाडू | २३ | १५ | ०८ | ०३ | ०१ | ०४ | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | आंतरराष्ट्रीय खेळाडू | ०१ | ० | ०१ | ०१ | ० | ० |
| | | पुरुष खेळाडू-३१ | पुरुष खेळाडू-३१ | - | - | - | - |
| | | २६ | २६ | - | - | - | - |
| एकुण | - | १६३ | ९१ | ७२ | | | |

एकुण पुरुष खेळाडु २९ अर्ज तसेच २ पुरुष खेळाडूंच्या अर्जावर आणखी एका पुरुष खेळाडूचा अर्ज सादर केलेला असे एकुण २ अर्ज=एकुण ३१ अर्ज बाद / अपात्र.

योजनेच्या लाभार्थी निवडीचे निकषात व स्वरुपानुसार बसत नसलेले एकुण ६० महिला खेळाडूंचे अर्ज बाद / अपात्र. (विनाअनुदानित खेळ, म.न.पा.क्षेत्राबाहेरील, स्पर्धेचा कालावधी तसेच असोसिएशनमार्फत व फेडरेशन मार्फत खेळ खेळलेले असलेल्यांचे इत्यादी)

प्रस्तुत प्रकरणी योजना क्र.१३ करीता प्राप्त झालेल्या १६३ अर्जांवर जिल्हा क्रीडा अधिकारी D.S.O. जळगांव यांनी प्राथमिक चौकशीत केलेल्या छाननीसहचे पत्र अहवालानुसार व तद्नंतर पुरस्कार निवड समितीच्या झालेल्या दि.१५/१०/२०२४ रोजीच्या प्रथम बैठकीतील इतिवृत्तानुसार व आज झालेल्या पुरस्कार निवड समितीच्या अंतीम बैठकीत पुरस्कारार्थीच्या प्राविण्याच्या प्रकारानुरुप पात्र खेळाडूंच्या प्रपत्र A,B,C,D प्रमाणे व योजनेतील श्रेणीनिहाय निर्णय घेतलेला आहे.

म.न.पा. महिला व बालकल्याण विभागाकडील महासभा ठराव क्र.११७२ दि.०७/०७/२०२३ मधील योजना क्र.१३ क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंना अर्थसहाय्य देणे कामी मंजुर डॉकेट मध्ये योजनेचा उद्देश, लाभार्थी निवडीचे निकष, लाभाचे स्वरुप श्रेणीनिहाय, लाभ वाटपाची कार्यपध्दती तसेच सदर योजनेवर वार्षिक अनुज्ञेय खर्च इत्यादी आंतरपरिवर्तनिय दर्शवून मंजुर करण्यात आलेला आहे. परंतु जाहिरातीच्या अनुसरुन व प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने उद्देश, लाभार्थी निवडीचे निकष, लाभाचे स्वरुप श्रेणीनिहाय, लाभ वाटपाची कार्यपध्दती तसेच सदर योजनेवर वार्षिक अनुज्ञेय खर्चात वाढ (अंदाजपत्रकात वाढ) योजनेच्या धोरणात व लक्षांकात बदल, इत्यादींवर प्रस्तुत प्रकरणी चर्चा व विचारविनियम करण्यासाठी दि.१०/१२/२०२४ रोजी आयुक्त यांचे कार्यालयातील सभागृहात बैठक घेण्यात आली. त्या बैठकीत प्रस्तुत प्रकरणी झालेल्या चर्चा व विचारविनिमयातील बाबी इतिवृत्तांत घेण्यात आलेल्या आहेत. अध्यक्ष तथा आयुक्त पुरस्कार निवड समिती यांनी मुख्य लेखापरिक्षक व मुख्य लेखाअधिकारी या दोनही अधिकारी वर्गाचा पुरस्कार निवड समितीत सदस्य म्हणून जा.क्र.आ.का./२३१८ दि.१४/१०/२०२४ चे आदेशान्वये समावेश करुन दि.१६/१२/२०२४ रोजी अध्यक्ष तथा आयुक्त म.न.पा.जळगांव पुरस्कार निवड समिती यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे कक्षात दुपारी ३:०० वाजता बैठक घेण्यात आली त्या समितीचे झालेल्या बैठकीतील चर्चा व विचारविनिमयातील बाबी पुढील प्रमाणे टिप्पणीत अनुक्रमित करण्यात येत आहे.

**१) मुख्य लेखापरिक्षक -** सदर योजना क्र.१३ च्या अनुषंगाने योजनेत नमूद केल्यानुसार योजनेच्या श्रेणीनिहाय क्रीडा स्पर्धेतील विजेता खेळाडूंना अर्थसहाय्य दयावयाचे झाल्यास प्रथम जिल्हास्तरीय खेळ, राज्यस्तरीय खेळ, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळ यामध्ये कोणकोणते खेळ समाविष्ठ आहे ते प्रथम ठरविणे आवश्यक आहे, या योजनेकरीता सन २०२३-२४ साठी आलेल्या विजेत्या खेळाडूंचे अर्जाप्रमाणे योजनेसाठी पात्र लाभार्थी निवडण्यासाठी प्रथम नियमावली व धोरण ठरविणे आवश्यक आहे. त्या करिता प्रथम योजनेत सुधारणा करण्यात यावी.

**२) मुलेअ-** जळगांव महानगरपालिका महिला व बाल कल्याणाच्या संबंधित उपक्रम / योजना क्रीडा स्पर्धेतील विजेता खेळाडूंना अर्थ सहाय्य योजनेबाबत यापुढे नियमावली व धोरण निश्चित करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे नियमावली व धोरण निश्चिती करुनच या योजनेची अंमलबजावणी करणे उचित राहील. सदर योजनेकरिता लाभ दयावयाचा झाल्यास प्रथम शासनाचे मान्यता प्राप्त खेळ या ठिकाणी ठरविणे आवश्यक आहे. त्याकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगांव यांचेकडून योजनेतील श्रेणी निहाय शासन मान्यता प्राप्त खेळ कोण कोणते आहेत ते प्रथम ठरविणे योग्य राहील.

योजना क्र.१३ मध्ये सदर योजनेवर एकूण १० लक्ष पर्यंत / प्रतिवर्ष वार्षिक अनुज्ञेय खर्च सन २०२३-२४ करिता महासभा ठराव मंजूर केलेला दिसून येत आहे. खर्च मर्यादा जास्त होत असल्यास त्या प्रमाणे महासभेत सुधारणा / दुरुस्ती आवश्यक आहे व त्याप्रमाणे अंदाजपत्रकात वाढीव तरतूदी करणेबाबत विभागाने प्रस्तावित करावे.

**३) उपायुक्त (सा.प्र.) -** योजनेच्या अनुषंगाने आलेल्या अर्जावर व मंजूर योजना क्र.१३ मध्ये योजनेचा उद्देश लाभार्थी निवडीचे निकष लाभाचे स्वरुप श्रेणी निहाय तसेच लाभ वाटपाची कार्यपध्दती त्या अनुषंगाने सदर योजनेवर दर्शविण्यात आलेला अनुज्ञेय खर्च यावर विचार विनिमय करण्यासाठी तसेच योजना क्र.१३ च्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या अर्जामध्ये

पात्र असलेल्या खेळाडूंची संख्या म्हणजे लक्षांक व हा योजनेतील लक्षांकापेक्षा जास्तीचा होत असल्याने व त्यामुळे खेळाडुंना लाभाचे स्वरुप निहाय, श्रेणी निहाय लागणारी लाभाची रक्कम जास्तीची होत असल्याने व त्या कारणास्तव मंजूर डॉकेटच्या अनुषंगाने योजनेवर वार्षिक अनुज्ञेय खर्चात वाढ होत असल्याचे दिसून येत असल्याने त्या करिता लक्षांत व खर्च मंजूर डॉकेटच्या अनुषंगाने अंतरपरिवर्तनिय असल्याने दुरुस्त अंदाजपत्रकात सुध्दा वाढीव तरतूद करणे अपेक्षित असून त्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करावी त्याकरीता योजना क्र.१३ मध्ये २०२३-२४ करीता म.न.पा. ठराव क्र.११७२ दि.०७/०७/२०२३ च्या मंजूर डॉकेटमध्ये खेळाडूंच्या श्रेणीनिहाय लक्षांकात तसेच लाभाचे स्वरुपात व दर्शविण्यात आलेल्या योजनेवरील वार्षिक अनुज्ञेय खर्चात अंतरपरिवर्तनीय बदल दर्शविण्यासाठी नव्याने महासभेपुढे प्रस्ताव सादर करणे उचित राहील असे मत आहे.

१) **आयुक्त तथा अध्यक्ष -** जळगांव महानगरपालिका महिला व बालकल्याणाच्या संबंधीत उपलब्ध / योजना राबविणे व त्याची अंमलबजावणी करणेकामी महासभा ठराव क्रं.११७२ दि.०७/०७/२०२३ अन्वये ०१ ते २३ योजनांना मंजूर डॉकेट अन्वये सन २०२३-२४ करिता मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यात योजना क्र.१३ करिता क्रीडा स्पर्धेतील विजेता खेळाडूंना अर्थ सहाय्य करणेबाबत स्थानिक वृत्तपत्रात दि.१९/०६/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करुन विहीत नमून्यात अर्ज मागविण्यात आलेले होते त्या अनुसरुन एकूण १६३ खेळाडूंचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. सदरचे अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी,जळगांव यांनी प्राथमिक छाननी केल्याबाबत व सदर योजनेच्या अनुषंगाने पुरस्कारार्थी निवड करण्यासाठी म.न.पा. आयुक्त स्तरावर पुरस्कार निवड समिती गठीत करण्याबाबत सूचित केल्याचे अनुषंगाने जा.क्र./आ.का./२३१८ दि.१४/१०/२०२४ अन्वये गठीत करण्यात आलेले असून निर्णय घेण्याप्रसंगीत समितीची प्रथम बैठक दि.१८/११/२०२४ रोजी व दि.२८/११/२०२४ रोजी आयुक्त तथा अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्या सोबत प्रपत्र A B C D मध्ये पात्र होत असलेल्या विजेत्या महिला खेळाडूंची यादी व प्रपत्र E मध्ये विजेत्या पुरुष खेळाडू असल्याने अपात्रतेची यादी व प्रपत्र F मध्ये योजनेतील निकषानुसार व स्वरुपानुसार पात्र ठरत नसलेल्या विजेत्या महिला खेळाडुंचे अर्ज अपात्रतेची यादीवर त्या वेळीच निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतु तद्नंतर जाहिरातीच्या अनुसरुन व प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने योजनेचा उद्देश, लाभार्थी निवडीचे निकष, लाभाचे स्वरुप श्रेणी निहाय, लाभ वाटपाची कार्यपध्दती तसेच सदर योजनेवर वार्षिक अनुज्ञेय खर्चात वाढ (अंदाजपत्रकात वाढ) योजनेच्या धोरण व लक्षांकात बदल इत्यादीवर प्रस्तुत प्रकरणी चर्चा व विचार विनिमय करण्यासाठी दि.१०/१२/२०२४ रोजी आयुक्त तथा अध्यक्ष यांचे कक्षात उपायुक्त (सा.प्र.) यांचे अध्यक्षतेखाली मुख्य लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांचे समवेत बैठक बोलविण्यात आली होती. त्या बैठकीत मुख्य लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी दोन्ही वर्गाचे पुरस्कार निवड समितीमध्ये सदस्य म्हणून समावेश करण्यात यावा असे ठरविण्यात आले. त्या अनुषंगाने जा.क्र./म.बा.क./२६५८/२०२४-२५ दि.१३/१२/२०२४ अन्वये दोन्ही सदस्यांची नांवे समाविष्ट करुन समिती गठीत करण्यात आली. त्या अनुसरुन पुरस्कार निवड समितीची बैठक दि.१६/१२/२०२४ रोजी दुपारी ३:०० वजता आयुक्त यांचे कार्यालयीन कक्षात घेण्यात आली. सदर बैठकीत प्रस्तुत योजना क्र.१३ च्या अनुषंगाने सन २०२३-२४ करीता म.न.पा. ठराव क्र.११७२ दि.०७/०७/२०२३ च्या मंजुर डॉकेटमध्ये खेळाडूंच्या श्रेणीनिहाय लक्षांकांत तसेच लाभाचे स्वरुपात व दर्शविण्यात आलेल्या अनुषंगाने पुरस्कार निवड समितीच्या वेळोवेळी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार प्रपत्र A B C D मधील पात्र होत असलेल्या जिल्हास्तरीय राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय महिला विजेत्या खेळाडूंच्या संख्या लक्षात घेऊन योजनेच्या कार्यपध्दतीत व नियमावलीत त्याप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे. तसेच प्रपत्र E मध्ये दर्शविण्यात आलेल्या विजेता महिला खेळाडू ह्या योजनेच्या लाभार्थी निवडीच्या व निकषात बसत नसल्याने (विना अनुदानित खेळ, म.न.पा. क्षेत्राबाहेरील, स्पर्धेचा कालावधी, असोसिएशन मार्फत व फेडरेशन मार्फत खेळ खेळलेले इत्यादी खेळाडू अर्जदार) यांना अपात्र करण्यात आलेले आहे. त्यानुसार सदर बैठकीत चर्चे अंती प्रस्तुत प्रकरणी कार्यपध्दतीत व नियमावलीत बदल करण्यासाठी व धोरण निश्चित करण्यासाठी महासभेपूढे सादर करावे.

प्रस्तुत प्रकरणाचे अनुषंगाने गठित पुरस्कार निवड समितीच्या दि.१५/१०/२०२४, दि.२८/११/२०२४, दि.१०/१२/२०२४, दि.१६/१२/२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील इतिवृत्ताचे अनुषंगाने योजना क्र.१३ मधील श्रेणीनिहाय प्रपत्र A B C D मधील पात्र होत असलेल्या एकुण ७२ क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिला खेळाडूंना लाभ दयावयाचे जर म.न.पा.महासभेने ठरविल्यास त्यासाठी लागणारा आवश्यक अपेक्षित निधी खर्च रक्कम रु.२०,८०,०००/- इतका म.न.पा.चे सन २०२४-२५ चे अंदाजपत्रकीय लेखाशिर्षकातील महिला व बालकल्याण करीताचे ५% राखीव निधी मधुन करावा लागेल. तसेच प्रपत्र E मध्ये पुरुष खेळाडू असल्याने ३१ पुरुष खेळाडूंचे अर्ज योजनेतील निकशानुसार व प्रपत्र F मध्ये दर्शविण्यात आलेल्या विजेत्या महिला खेळाडू या योजनेच्या लाभार्थी निवडीच्या निकषात बसत नसल्याने (विना

अनुदानित खेळ, म.न.पा. क्षेत्राबाहेरील, स्पर्धेचा कालावधी, असोसिएशन मार्फत व फेडरेशन मार्फत खेळ खेळलेले इत्यादी खेळाडू अर्जदार) यांना पुरस्कार निवड समितीच्या बैठकीतील इतिवृत्ताचे अनुषंगाने अपात्र करण्यात आलेले आहे. त्याकरिता इतिवृत्तांच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय, राज्य स्तरीय व आंतरराष्ट्रीय महिला विजेत्या खेळाडूंच्या संख्या लक्षात घेऊन योजनेच्या धोरणात, कार्यपध्दतीत व नियमावलीत त्याप्रमाणे बदल करणे प्रथम आवश्यक आहे. योजना क्र.१३ मध्ये सदर योजनेवर एकुण १० लक्ष पर्यंत / प्रतिवर्ष वार्षिक अनुज्ञेय खर्च सन २०२३-२४ करिता महासभा ठरावान्वये डॉकेटनुसार मंजुर केलेला दिसुन येत आहे. खर्च मर्यादा जास्त होत असल्यास त्याप्रमाणे महासभेत सुधारणा / दुरुस्ती आवश्यक आहे. करिता अंदाजपत्रकात वाढीव तरतूदी करणे सुध्दा आवश्यक राहील. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने पुरस्कार निवड समितीच्या झालेल्या बैठकीतील इतिवृत्तात निर्देशित केलेल्या बाबी शिफारशीनुसार बदल करणेस मान्यता मिळण्यासाठी अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- १२** **प्रशासक ठराव क्र :-२२२** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रशासन अधिकारी, म.न.पा.शिक्षण मंडळ यांचेकडिल जा.क्र./मनपाशिमं/२०२४-२५/४५१ दि.०९/०१/२०२५
३. उपायुक्त (सा.क.) यांचा दि.२४/१२/२०२४ चा अभिप्राय
४. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.२७/१२/२०२४ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.०१/०१/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** आयुक्त तथा प्रशासक, मनपा जळगांव यांचे मंजूरीन्वये शेख सलीम शेख मुस्तफा, उपशिक्षक म.न.पा.उर्दू शाळा क्र.१७, सांगली यांच्या एकतर्फी आंतरजिल्हा बदलीस संमतीपत्र मिळणेसाठी मान्यता देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व प्रशासन अधिकारी, म.न.पा.शिक्षण मंडळ यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग, सांगली, मिरज आणि कुपवाडा शहर आस्थापनेवरील कार्यरत शेख सलीम शेख मुस्तफा, उपशिक्षक, म.न.पा.उर्दू शाळा क्रं.१७ सांगली येथे दि.२३/०३/२०१८ पासून १० वर्षापासून सेवेत कार्यरत आहे. त्यांचे मुळगाव अडावद ता.चोपडा जि.जळगांव येथील रहिवासी असून ते स्वत: उजव्या पायाने ७०% दिव्यांग असून त्यांचा एक पाय कृत्रिम आहे. घरात ते एकटेच कर्तव्यक्ती असून त्यांचे आई-वडील वयोवृध्द व सतत आजारी असल्याने त्यांची देखभाल करणेसाठी त्यांना त्यांचे मुळगाव अडावद ता.चोपडा जि.जळगांव येथे राहणे आवश्यक आहे. तसेच त्यांचे मुळगांव अडावद ता.चोपडा जि.जळगांव ते सांगली, मिरज आणि कुपवाडा शहरापासूनचे अंतर ६५० किलोमीटर आहे. म्हणून संबंधीतांनी जळगांव महानगरपालिका शिक्षण मंडळ,जळगांव या आस्थापनेवर एकतर्फी दिव्यांग आंतरजिल्हा अंतर्गत बदली होणेसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेकरीता दि.१९/१२/२०२४ रोजी प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ,जळगांव या कार्यालयास पत्र प्राप्त झालेले आहे.

तथापि, शासन निर्णय दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ नुसार संबंधीतानी नियमानुसार प्रशासकीय अधिकारी यांच्याकडे आंतरजिल्हा बदलीसाठी विनंती अर्ज व परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे. तरी उक्त शासन निर्णयात दिलेल्या अटी व शर्ती नुसार नियुक्ती प्राधिकाऱ्याचे नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे.

तसेच उपायुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाडा महानगरपालिका शिक्षण विभाग यांनी जा.क्र.शिक्षण/आजिब /११३०/२०२४ दि.०५/१२/२०२४ रोजी च्या पत्रान्वये शेख सलीम शेख मुस्तफा, उपशिक्षक म.न.पा.उर्दू शाळा क्रं.१७, सांगली यांच्या एकतर्फी आंतरजिल्हा बदलीस महानगरपालिका शिक्षण मंडळ,जळगांव या आस्थापनेवर सामावून घेणेस संमतीपत्र दिल्यास संबंधीत शिक्षकास महानगरपालिका शिक्षण विभाग, सांगली येथून कार्यमुक्त करण्याबाबत त्यांचे पत्रात दिलेल्या अटीचे अधिन राहून शासन नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत येईल असे नमूद आहे.

तसेच शासनाकडील प्राप्त सूचनांनुसार व आयुक्त, महानगरपालिका,जळगांव यांची दि.२४/०१/२०२४ चे मंजूर टिपणीन्वये जळगांव शहर महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत पवित्र पोर्टल प्रणालीवर एकूण ०३ “खुला” प्रवर्गातील रिक्त पदांच्या ८०% मर्यादेत ०२ उर्दू शिक्षणसेवकांची मागणी नोंदविण्यात आलेली होती. उक्त मागणीनुसार पवित्र पोर्टलवरुन “खुला” प्रवर्गातील ०२ शिक्षणसेवक हजर झालेले आहेत. तसेच या शैक्षणिक वर्षात ०५ “खुला” प्रवर्गातील उर्दू माध्यम शिक्षकांना एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने कार्यमुक्त करणेत आलेले असून आज रोजी उर्दू शिक्षकांची “खुला” प्रवर्गातील ०६ जागा रिक्त आहेत.

शेख सलीम शेख मुस्तफा, उपशिक्षक, म.न.पा.उर्दू शाळा क्र.१७, सांगली यांना जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव आस्थापनेवर एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने सामावून घेण्यासाठी त्यांना एकतर्फी आंतरजिल्हा बदली प्रस्तावास संमतीपत्र देणेस मान्यता मिळण्यासाठी प्रशासन अधिकारी, जळगांव शहर महानगरपालिका.शिक्षण मंडळ यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- १३** **प्रशासक ठराव क्र :-२२३** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, (सार्व.स्वच्छता) यांचेकडिल जा.क्र./सार्व.स्वच्छता वि./९७७/२०२४-२५ दि.१४/०१/२०२५
३. उपायुक्त यांचा दि.१३/०१/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१४/०१/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता दुत (Swacchhata Brand Ambassador) नियुक्त करणे बाबत.

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, (सार्व.स्वच्छता) यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

D.O.No.१४/०४/२०१८ SBM II, Government of India Ministry of Housing and Urban Affairs Nirman Bhawar March 2018), V.K. Jindal संयुक्त सचिव तथा मिशन निदेशक, स्वच्छ भारत अभियान, नवि दिल्ली., तसेच स्वच्छ भारत अभियान अंतर्गत मार्गदर्शक सूचनांनूसार स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता दुत (Swacchhata Brand Ambassador) नियुक्त करणे आवश्यक आहे.

नागरिकांमध्ये सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छते विषयी संस्कार रुजविणे तसेच वर्तन बदल (Behaviour Change) घडवून आणने स्वच्छ भारत अभियानाचे मुळ उद्दिष्ट आहे. त्याकरिता देश पातळीवर हा कार्यक्रम प्रभावीपणे लोकसहभागातून राबविला जात आहे. त्याच प्रमाणे जळगांव शहरातील म.गांधी रिसर्च फाऊडेशन आणि भवरलाल & कांताबाई जैन फाऊडेशन यांचे शैक्षणिक, सामाजिक, व क्रिडा क्षेत्रात महत्वाचे योगदान आहे. तसेच सदर फाऊडेशन मार्फत शहर सौदर्यीकरणा सोबतच शहर स्वच्छतेचे अनेक उपक्रम आणि शहरात ठिकठिकाणी वृक्षारोपण प्रत्येक वर्षी राबवित आहे. व सदर वृक्षांना जगविण्यासाठी फाऊडेशनच्या स्वखर्चाने पाण्याची व्यवस्था सुध्दा केली जाते. तसेच शहरातील नागरीकांसाठी शहरात भाऊचे उदयान, महात्मा गांधी उदयान स्वनिधीतून विकसित केले आहे. तसेच काव्यरत्नावली चौक आणि स्वातंत्र्य चौकाचे स्वनिधीतून सुशोभिकरण केले आहे. म.गांधी रिसर्च फाउडेशन आणि भवरलाल & कांताबाई जैन फाऊडेशनच्या या कार्यामुळे शहरातील नागरिकांना स्वच्छता विषयी प्रेरणा मिळत आलेली आहे. यामुळे शहरातील नागरिकांचे सदर संस्थां प्रति सदभावना निर्माण झालेल्या आहेत. या कार्याची दखल म्हणून तसेच शहरवासियांना स्वच्छतेविषयी प्रेरणा मिळत रहावी या अनुषंगाने सदर संस्थांचे अध्यक्ष श्री.अशोकभाऊ जैन यांना स्वच्छता दुत (Swacchhata Brand Ambassador) म्हणून घोषित करता येईल.

करिता उपरोक्त प्रस्तावित नुसार स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता दुत (Swacchhata Brand Ambassador) म्हणून घोषित करणेकामी मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त, (सार्व.स्वच्छता) यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- १४** **प्रशासक ठराव क्र :-२२४** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. अतिक्रमण अधिक्षक, अतिक्रमण विभाग यांचेकडिल जा.क्र./अति.नि.वि./४१/२०२४-२५ दि.१३/०१/२०२५
३. सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.०७/०१/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०९/०१/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** प्रशासक ठराव क्र.११३ दिनांक:-१९/०७/२०२४ अन्वये आस्थापना विभागामार्फत कामगारां संबधित ई-निविदा प्रक्रिया न राबविता अतिक्रमण निर्मुलन विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळावी व याप्रमाणे सदर ठरावात बदल करणेस व अतिक्रमण निर्मुलन विभागाने आवश्यकते प्रमाणे कामगारांसाठी ई निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव.

---

वाचा क्र.१ व अतिक्रमण अधिक्षक, अतिक्रमण विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

अतिक्रमण निर्मुलन विभागाकडेस सदयस्थितीत मनुष्य बळ कमी उपलब्ध असल्याने सन-२०२४-२५ करीता सुध्दा अतिक्रमण निर्मुलन विभागास ३५ मजुरांची आवश्यकता असल्याने सदर मनुष्य बळ घेणेसाठी आयुक्त यांनी दिनांक:-०८/०७/२०२४ रोजी ई निविदा मागविण्यांस मान्यता दिलेली आहे.

त्याअनुषंगाने मनुष्यबळासाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी महासभेकडेस जा.क्र/अति.नि.वि/२१/२०२४-२५ दिनांक:-०९/०७/२०२४ अन्वये प्रस्ताव सादर केला असता. प्रशासक ठराव क्र.११३ दिनांक:-१९/०७/२०२४ अन्वये प्रस्ताव च्या अनुषंगाने पुढील निर्णय झालेला आहे. "तथापी मनुष्यबळ पुरविणेबाबत उचित अभिकर्त्याची नियुक्ती करणे उचित असल्याने सर्व विभागासाठी मनुष्यबळ पुरविणेकामी निविदा प्रक्रिया ही सामान्य प्रशासन आस्थापना विभागामार्फत राबविणेत यावी, तशी मागणी आस्थापना विभागाकडे नोंदवावी. त्याच बरोबर ज्या ज्या विभागांना बाहययंत्रणे मार्फत पुरविणेत येणा-या मनुष्यबळाची आवश्यकता असेल, अशा सर्व विभाग व विभाग प्रमुख यांनी आवश्यक मनुष्यबळाच्या तपशीलसह[ कुशल/अकुशल ] [ पदनाम व संख्या ] उपायुक्त [सा.प्र ] यांचे कडेस मागणी नोंदवावी व आस्थापना विभागामार्फत बाहयंत्रणे मार्फत पुरविणेत येणा-या मनुष्यबळा संदर्भातील, नियम, शासन निर्णय, मार्गदर्शक तत्वे इ. बाबी विचारात घेवून निविदा प्रक्रिया राबवावी व निविदा प्रक्रिये संदर्भातील उचित व आवश्यक तो प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करावा व तदनंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करावी. तथापी सदर निविदा प्रक्रिया अंतिम होईपावेतो प्रस्तुत अभिकर्त्यास मनुष्यबळ पुरविणेकामी मुदतवाढ देणेत येत आहे. नविन निविदा प्रक्रिया सा.प्र विभागाने नियमानुसार यथाशीघ्र अंतिम करणेची दक्षता घ्यावी. विभागाने वैधानिक कार्यवाही करावी."

अतिक्रमण विभागाकडुन आस्थापना विभागाकडेस मनुष्यबळ पुरवठाची दोन वेळा मागणी केलेली आहे. तथापी अदयाप पावेतो वरील प्रक्रिया करुन आस्थापना विभागाकडुन सदर बाबत मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेत आलेले नाही. तरी अतिक्रमण विभागात मनुष्यबळ नसल्याने अतिक्रमण विभागाची कोणतीही कार्यवाही प्रभावीपणे करता येत नाही. सदर बाबत आयुक्त यांनी दिनांक:-२५/११/२०२४ रोजी झालेल्या आढावा बैठकीत ज्या विभागास मजुरांची आवश्यकता असेल त्यांनी आपल्या विभागाची निविदा प्रक्रिया संबधित आवश्यक कार्यवाही संबधित विभागाकडुन करावी अश्या सूचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने प्रशासक ठराव क्रमांक-११३ दिनांक:- १९/०७/२०२४ मध्ये पुढील बदल करणे आवश्यक आहे. आस्थापना विभागात पुरेशा कर्मचारी वर्ग नसल्याने व अतिक्रमण विभागाकडेस कामगारांची आवश्यकता असल्याने बाहय यंत्रणे मार्फत पुरविणेत येणा-या मनुष्यबळाची आस्थापना विभागामार्फत निविदा प्रक्रिया न राबविता ती निविदा प्रक्रिया ही अतिक्रमण विभागामार्फत नियमानुसार राबविणे आवश्यक आहे.

तथापि प्रशासक ठराव क्र.११३ दिनांक:- १९/०७/२०२४ अन्वये आयुक्त यांचे दि.०४/१२/२०२४ चे निर्देशानुसार निविदा प्रक्रिया राबविणे बाबत आस्थापना विभागाचा अभिप्राय मागविला असता तो पुढील प्रमाणे " प्रस्तुत प्रकरणी अतिक्रमण विभागाने प्रस्तावित केलेप्रमाणे मनपाकडील कार्यरत अपूरे मन्युष्यबळ पाहाता, आवश्यकतेनुसार निकड लक्षात घेता सदर विभागाने बाह्ययंत्रणेमार्फत ई निविदा व्दारे मजुर मन्युष्यबळ उपलब्ध करून घेण्यास हरकत नाही . तथापी लेबर ॲक्ट व नियमान्वये शासनाने वेळोवेळी प्रचलित केलेल्या निर्देशांचे पालन करणे आवश्यक राहील. PF, ESIC नियमित शासनास भरणा करणे, IT, GST नियमित कपात करणे इ.अटी शर्तीसह निविदा प्रक्रिया करणे बाबत विभागाने दक्षता घ्यावी."

आस्थापना विभागाकडील उपरोक्त अभिप्रायानुसार अतिक्रमण निर्मुलन विभागासाठी लागणारे ३५ मजुरांची ई - निविदा प्रक्रिया अतिक्रमण निर्मुलन विभागाकडुन करणे आवश्यक आहे. मजुरांसाठी कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, ई ब्लॉक,सी-२० वांदे-कुर्ला संकुल,वांद्रे[पु] मुंबई यांचे कडुन दर सहा महीन्यानंतर प्रसिध्द होण्या-या मजुरांना दिला जाणारा किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत प्रसिध्द पुस्तीका मधील अ.नं.४९ मधील कामगाराची वर्गवारी [पूर्ण कालिक सफाई कामगार किंवा मेहतर,तत्सम कामगार] परीमंडळ २ नुसार

मुळ वेतन १०,००० +विशेष भत्ता ६३५८ = १६३५८ प्रति महीना इतका असुन

१ दिवसा करीता प्रति कामगार ६२९ इतके किमान वेतन येत आहे.

तरी २०२४-२५ करीता ३५ मजुर करीता किमान वेतन कायदा १९४८ नुसार रु. ६२९ प्रमाणे ३५ कामगार साठी रु.२२०१५ /- प्रति रोज या प्रमाणे २६ दिवसा करीता [४ रविवार साप्ताहीक सुटी] रु.७२३९० प्रति महीना या प्रमाणे १२ महीन्या करीता रु.६८६८६८०/-इतका खर्च अपेक्षित आहे. त्यावर १८**%** GST रु.१,२३,२३६/- असे एकुण- रक्कम रु.६९,९२,३१६/-असा येत आहे. कंत्राटी मजुर व वाहने व इतर साहीत्य खरेदी हया हेडखाली सन.२०२४-२५ करीता रक्कम रु.७०,००,०००/- अशी बजेट तरतुद करण्यात आलेली आहे.

महासभा / प्रशासक ठराव क्र.११३ दिनांक:-१९/०७/२०२४ ठरावात आस्थापना विभागाकडुन निविदा प्रक्रिया न राबविता अतिक्रमण विभागामार्फत जाहिर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस तसेच लेबर ॲक्ट व नियमान्वये शासनाने वेळोवेळी प्रचलित केलेल्या निर्देशांचे पालन करून PF, ESIC नियमित शासनास भरणा करणे IT, GST नियमित कपात करणे इ.अटी शर्तीसह निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी असा ठरावात बदल करणेस व त्याप्रमाणे अतिक्रमण विभागामार्फत स्वतंत्र ई निविदा प्रसिध्द करण्यांस मान्यता मिळणेस व ३५ कामगारा साठी एक वर्षा करीता होणा-या रक्कम रु.६९,९२,३१६/- खर्चास मान्यता मिळण्यासाठी अतिक्रमण अधिक्षक, अतिक्रमण विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. उपरोक्त कामी मक्तेदारास ११ महिने कालावधी करीता मजुर पुरवठा करण्याचे कामाचा मक्ता देण्यात यावा व त्यानूसार जाहिर निविदा प्रसिध्द करुन पूढील नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

अतिक्रमण निर्मूलन अधिक्षक यांनी वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- १५** **प्रशासक ठराव क्र :-२२५** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. परिवहन विभाग प्रमुख यांचेकडिल जा.क्र./परिवहन/२५/२०२५ दि.१४/०१/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.०९/०१/२०२५ चा अभिप्राय
४. सहाय्यक आयुक्त यांचा दि.०९/०१/२०२५ चा अभिप्राय
५. उपायुक्त यांचा दि.०९/०१/२०२५ चा अभिप्राय
६. सहायक संचालक यांचा दि.१३/०१/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** मौजे मेहरुण, जळगांव शहर न.भू.क्र.५५८६, ५५७७ व ५५७६ येथील जागेवर केंद्र शासन पुरस्कृत ई बस डेपो प्रस्तावीत करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व परिवहन विभाग प्रमुख, परिवहन विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महासभा प्रशासक ठराव क्र.१८ दि.२३/११/२०२३ नुसार टी.बी. सॅनेटोरीयम, सर्व्हे क्र.४१८/४१९ पै. मेहरुण ही जागा केंद्र शासन पुरस्कृत पीएम-ई बससेवा योजनेच्या बस डेपोसाठी (५० बसेस करीता) निश्चित करणेस मंजूरी मिळालेली आहे.

गाव नमुना ७/१२ उताऱ्यानुसार मौजे मेहरुण शिवार स.क्र.४१८ ही जागा व्हाईस प्रेसीडेंट म्युनिसीपल कमेटी जळगांव नावे असुन स.क्र.४१९ ही जागा देखील व्हाईस प्रेसीडेंट म्युनिसीपल कमेटी जळगांव नावे असुन दोन्ही जागा महानगरपालिका ताब्यात आहेत.

केंद्र शासन पुरस्कृत ई-बस सेवा योजनेअंतर्गत ई-बस डेपोचे बांधकाम प्रत्यक्ष जागेवर सुरु करण्यात आलेले असुन बस डेपो करीता अनुषांगीक बाबींकरीता विस्तारीत जागेची आवश्यकता आहे. तरी मौजे मेहरुण स.क्र.४१८, ४१९ लगतच महानगरपालिका ताब्यात असलेली स.क्र.४२१ पै. जागा उपलब्ध असून सदर जागा ई-बस डेपोकरीता सुयोग्य आहे. ई-बस डेपोच्या प्राथमिक सर्व्हेक्षणात देखील या जागेचा समावेश आहे.

उपरोक्त नमुद मौजे मेहरुण येथील स.क्र.४१८, ४१९, ४२१ पै. व लगत असलेला परिसर नगर भुमापन अधिकारी,जळगांव विस्तारीत क्षेत्रात समाविष्ठ करण्यात आलेला असुन स.क्र.४१८ पै. व ४१९ पै. यांस नगर भुमापन क्र.५५८६ तसेच स.क्र.४२१ पै. यांस नगर भुमापन क्र.५५७६ व ५५७७ असे क्रमांक देण्यात आलेले आहेत. जळगांव शहर विस्तारीत क्षेत्र न.भू.क्र.५५८६ क्षेत्रफळ ८१७८ चौ.मी. ही जागा नगर परिषद जळगांव नावे आहे. तसेच जळगांव शहर विस्तारीत क्षेत्र न.भू.क्र.५५७६ क्षेत्रफळ ७००.३० चौ.मी. या जागेचा मिळकत उतारा आज रोजी उपलब्ध नसला तरी सोबत जोडलेल्या चौकशी नोंदवही नुसार सदर जागेचा धारणाधीकार “फ” असुन नोंदवही मध्ये स्पष्टपणे दिसुन येत असलेल्या खोडखाड मध्ये नगरपरिषद जळगांव हेच नाव निर्णयीत दिसुन येत आहे. प्रत्यक्ष जागेवर प्राथमिक सपाटीकरण तसेच कुंपण भिंतीकरीता खोदकाम करण्यात आलेले असुन अदयाप पावेतो सदर जागेबाबत तक्रार प्राप्त नाही. सदर जागेवर महानगरपालिकेचे नाव लावणेबाबत रितसर अपील दाखल करण्यात येणार आहे. सदर जागेमधून महानगरपालिका मालकीची मुख्य जलवाहिनी देखील गेलेली असुन शासकीय दस्तऐवजांमध्ये खाडाखोड करुन शासनाची दिशाभूल करण्याचा कोणाचातरी उद्देश स्पष्टपणे दिसुन येत आहे. त्याचप्रमाणे नवीन मंजुर होत असलेल्या विकास आराखडयात सदर उपभुखंडाच्या क्षेत्रासोबतच लगत असलेल्या नगर भुमापन क्र.५५७६, ५५७७ व ५५८६ जागेवर बस डेपो व पार्किंगचे आरक्षण दर्शविणेकामी नगर रचनाकार, विकास योजना विशेष घटक यांस दि.१६/१२/२०२४ रोजी कळविण्यात आलेले आहे.

तसेच नगरभूमापन क्र.५५७७ या जागी आज रोजी महानगरपालिकेचे कचरा सकंलन केंद्र सुरु असुन ई-बस डेपोच्या प्रस्तावीत बांधकामास अडथळा ठरीत असल्यारकारणामुळे इतर जागेत स्थलांतरीत करुन सदर कचरा संकलन केंद्र तोडणे आवश्यक आहे. सदर केंद्र नव्याने बांधणेकरीता यापुर्वीच निविदा प्रसिध्द करण्यात आलेली असुन निविदा प्रक्रियेअंती नवीन कचरा संकलन केंद्राचे बांधकाम निविदेनुसार टी.बी. सॅनेटोरियम च्या जागेत करण्यात येणार आहे.

म्हणून उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने महासभा प्रशासक ठराव क्र.१८ दि.२३/११/२०२३ नुसार टी.बी.सॅनेटोरीयम, सर्व्हे क्र.४१८/४१९ पै. सोबतच स.क्र.४२१ पै. म्हणजेच मौजे मेहरुण जळगांव शहर विस्तारीत क्षेत्रानुसार नगर भुमापन क्र.५५७६, ५५७७ व ५५८६ या जागेवर बस डेपोचे प्रस्तावीत बांधकाम करणेस मान्यता मिळण्यासाठी परिवहन विभाग प्रमुख, परिवहन विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- १६** **प्रशासक ठराव क्र :-२२६** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. परिवहन विभाग प्रमुख यांचेकडिल जा.क्र./परिवहन/२६/२०२५ दि.१४/०१/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.०१/०१/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.०९/०१/२०२५ चा अभिप्राय
५. सहायक संचालक यांचा दि.१३/०१/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** केंद्र शासन पुरस्कृत पी एम ई बस सेवा योजने अंतर्गत बांधण्यात येत असलेल्या बस डेपो करिता अडथळा ठरित असलेले पडाऊ अवस्थेतील बांधकाम तोडणेबाबत.

---

वाचा क्र.१ व परिवहन विभाग प्रमुख, परिवहन विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

केंद्र शासन पुरस्कृत ई-बस सेवा सुरु करण्याचा प्रथम टप्पामधील स्थापत्य निगडीत कामांचे कार्यादेश पवडी क्र.९३ दि.११/१०/२०२४ रोजी मक्तेदार श्री श्री इन्फ्रास्ट्रक्चर, जळगांव यांस देण्यात आलेले असुन मक्तेदार यांचेमार्फत दि.१३/१०/२०२३ रोजी प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आलेली आहे. तरी सदर स्थळी जळगांव न.भू.क्र.५५८६ (जुने टी.बी.सॅनेटोरीयम) येथील काही बांधकाम अडथळा ठरीत असुन बस डेपोच्या बांधकामाकरीता निष्काशीत करणे आवश्यक आहे. परिसरामधील उत्तर-पुर्व कोपऱ्यामधील ८ मी x ११ मी मापे असलेले तसेच पुर्वेकडील १०.५० x ९.५० मी मोपे असलेले एकूण ०४ नग असे एकत्रीत ०५ तळमजल्यावरील लोडबेअरींग स्वरुपातील चुना वीटकामात असलेली बांधकामे लगत असलेल्या शौचालयासह तोडणे आवश्यक आहे. सदर बांधकामे सन १९६३ साली बांधण्यात आलेली असुन आज रोजी सदर बांधकामांचा वापर बंदावस्तेत व पडाऊ स्वरुपाचा आहे.

तरी प्रस्तावीत ई-बस डेपोच्या बांधकामास अडथळा ठरीत असलेली जुने टी.बी.सॅनेटोरीयम परिसरातील उपरोक्त बांधकामे महानगरपिलका यंत्रणे मार्फत तोडणेस मान्यता मिळण्यासाठी परिवहन विभाग प्रमुख, परिवहन विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- १७** **प्रशासक ठराव क्र :-२२७** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडिल जा.क्र./आस्था/२९९८/२०२४-२०२५ दि.१४/०१/२०२५
३. उपायुक्त (सा.प्र.) यांचा दि.१३/०१/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** सन २०२५-२६ करीता ज.श.म.न.पा.स बाह्ययंत्रणेव्दारे मनुष्यबळ पुरविणेबाबत.

---

वाचा क्र.१ व आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा वाचा क्र. २ व ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिकेत कमी मनुष्यबळामुळे विहीत मुदतीत कामे करुन घेणेस सर्व विभागांना अडचणी येत असल्याने यापुर्वी १७९ दिवसांकरीता तात्पुरत्या मानधन तत्वावर कार्यरत विविध पदांसाठीचे उमेदवारांना सेवाखंड देऊन विविध अटी शर्तीनुसार नियुक्त करणेसाठी आस्थापना विभागामार्फत सादर करण्यांत आलेल्या जा.क्र./आस्था/१३९०/ दि.३०/०७/२०२४ च्या प्रस्तावास प्रशासक ठराव क्र.१३२ दि.३१/०७/२०२४ नुसार मान्यता दिलेली आहे.

सदर ठरावानुसार दिनांक ५ ऑगष्ट २०२४ पासुन विविध पदांवर ७३ उमेदवारांना १७९ दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नियुक्ती देण्यात आलेली होती. त्यापैकी आजमितीस ६४ उमेदवार कार्यरत असुन सदर उमेदवारांची मुदत दिनांक ३१/०१/२०२५ रोजी संपुष्टात येणार आहे. उक्त उमेदवारांना देण्यात आलेल्या तात्पुरत्या मानधन तत्वावरील नियुक्ती पत्रात " सदर नियुक्ती ही विहीत कालावधीसाठी व तात्पुरत्या स्वरुपाची असल्याबाबत संमती / प्रतिज्ञापत्र घेणेत आलेले असुन तात्पुरत्या व विशिष्ट कालावधीनंतर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येणार असुन संबंधितांना त्याबाबत न्यायालयात अथवा कोणत्याही प्राधिकरणासमोर दाद मागता येणार नाही व त्या नियुक्ती पत्रा आधारे कायमस्वरुपी नोकरीची मागणी करता येणार नाही " अशा आशयाच्या अटी शर्ती नमुद करणेंत आलेल्या आहेत.

जळगांव शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर २१५७ पदे मंजुर असुन डिसेंबर २०२४ अखेर ८०७ रिक्त पदे आहेत. महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये सेवानिवृतीनंतर मोठया प्रमाणावर पदे रिक्त होत असुन सदर रिक्त पदामुळे इतर अधिकारी / कर्मचाऱ्याकडुन अतिरिक्त पदभार देऊन कामे करवुन घेतली जात आहेत. शासन निर्णय क्रमांक काआआ-२०२३/प्र.क्र.२३३/काम-८ दि.१८/०१/२०२३ नुसार बाह्य यंत्रणेव्दारे मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यासाठी दि.१८/०६/२०१४ च्या शासन निर्णयाव्दारे गठीत सेवा पुरवठादारांच्या पॅनलला देण्यात आलेली मुदतवाढ संपुष्टात आणण्यात आलेली आहे. जळगांव शहर महानगरपालिका मार्फत कंत्राटी मानधन तत्वावर नियुक्त कर्मचाऱ्यांची मुदत संपलेनंतर सदर विभागाची कामे करवुन घेणेकरीता विभागप्रमुखांकडुन प्राप्त मागणीनुसार व आवश्यकतेनुसार सन २०२५-२६ करीता बाह्य यंत्रणेव्दारे मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेकामी आवश्यक ती निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळण्यासाठी आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. विभागाने उपरोक्त कामी मक्तेदारास ११ महिने कालावधी करीता बाह्य यंत्रणेव्दारा मनुष्यबळ पूरविणे बाबतचा मक्ता दयावा व त्यानूसार नियमाप्रमाणे जाहिर निविदा प्रसिध्द करुन पूढील उचित कार्यवाही करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- १८** **प्रशासक ठराव क्र :-२२८** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचेकडिल जा.क्र./न.र./१२०८/२०२५ दि.१४/०१/२०२५

३. सहाय्यक नगररचनाकार यांचा दि.१०/०१/२०२५ चा अभिप्राय

४. सहाय्यक संचालक, नगररचना यांचा दि.१३/०१/२०२५ चा अभिप्राय

५. आयुक्त यांचा दि.१३/०१/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेच्या, मौजे खेडी बु. गट क्र.६१ पै. येथील जमिनीवरील आरक्षण क्रं.१८८ पार्कींग हे आरक्षण वगळुन जमिन क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ठ होणे बाबत.

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

श्री.प्रल्हाद जुलाल पाटील व इतर ३ यांचेकडील दि.०८/०१/२०२४ रोजीचा अर्ज नगररचना विभागास प्राप्त आवक क्र.२४३४ दि.११/०१/२०२४ तसेच आयुक्त कार्यालयामार्फत प्राप्त आवक क्रं.२९२ दि.१२/०१/२०२४ व श्री श्री धरतीधन रियालीटी प्रा.लि.जळगांव यांचे कडील दि.०३/०९/२०२४ रोजीचा अर्ज नगररचना विभागास प्राप्त आवक क्र.१३४० दि.०३/०९/२०२४ तसेच आयुक्त कार्यालयामार्फत प्राप्त आवक क्र.१३७२ दि.०५/०९/२०२४ चे अर्ज नगररचना विभागास प्राप्त संबंधीत अर्जदार यांनी मौजे खेडी बु. गट नं.६१ पै. येथील जमिनीवरील आरक्षण क्र.१८८ पार्कीग हे आरक्षण वगळुन जमिन क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ठ होणे बाबत विनंती केलेली आहे.

जळगांव शहराकरीता शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस. ३५९९/७३८/सि.आर-१४२ (ए) युडी-९ दि.११/०१/२००२ अन्वये विकास योजना (वाढीव हद्द) मंजुर केलेली असुन उक्त विकास योजना दि.०७/०४/२००२ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच उर्वरीत वगळलेल्या भागाची विकास योजना (इ.पी) शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५०३/४९३/सि.आर-१०२ (ए) ०३/युडी-९ दि.१०/०८/२००४ मंजुर केलेली असुन उक्त योजना दि.०१/१०/२००४ पासुन अंमलात आलेली आहे.

उक्त मंजुर विकास योजनेतील मौजे खेडी बु. गट क्र.६१ पै ही जागा औदयागिक विभागात समाविष्ठ असुन या जागेपैकी ६१/२अ, ६१/३ब, ६१/२क, ६१/२/ब/३अ, ६१/१ या जागेचे एकुण क्षेत्रफळ २ हेक्टर ४६ आर असुन या प्रमाणे आरक्षणे प्रस्तावित आहे. तसेच या जागेतील दक्षिणेकडील ६१/२ क मध्ये १८ मी. रुंद विकास योजना रस्त्याच्या पश्चिमेकडील क्षेत्र रहीवास विभागात समाविष्ठ आहे.

उपरोक्त अर्जानुसार अर्जदार यांनी मौजे खेडी बु. गट क्र.६१ पै. येथील जागेच्या विकासनाकरीता जमिनीवरील आरक्षण क्र.१८८ पार्कीग हे आरक्षण वगळुन जमिन क्षेत्र रहीवास विभागात समाविष्ठ होणे बाबत विनंती केलेली असुन त्याकरीता खालील प्रमाणे कारणे नमुद केलेली आहे.

अर्जदार यांनी त्यांचेकडील अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे विकास योजने मधील जमिन लगत एम.आय.डी.सी. प्राधिकरणाने कारखानदारांना सुविधा पुरविणे करीता त्यांच्याच हद्दीत ट्रक टर्मिनल्स करीता नियोजन केलेले असुन आरक्षित जागेच्या हद्दीपासुन २०० मी. अंतरावर सुमारे ३०५७५ चौ.मि. जागेवर नियोजन केलेले आहे. तसेच एम.आय.डी.सी. कार्यालय, धुळे यांनी दि.१४/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये वाहनतळाच्या कामाकरीता कार्यादेश सुध्दा दिल्याचे नमुद केलेले आहे. तसेच अर्जदार यांनी असेही नमुद केलेले आहे की, विकास योजनेमध्ये दर्शविलेला औदयोगिक झोन मधील बहुतांशी भाग हा विदयमान औदयोगिक क्षेत्रामध्ये आहे व त्यामुळेच सभोवतालचा भाग सुध्दा औदयोगिक झोनमध्ये दर्शवला गेला आहे. त्याच प्रमाणे अर्जदार यांनी असेही नमुद केलेले आहे की, या परिसरामध्ये कोणतेही प्रकल्प, रेल्वे स्टेशन, बाजारपेठ, बस स्टॅण्ड इ. नसतांनाही विकास

योजना तयार करतांना फक्त लगतची विदयमान एम.आय.डी.सी. गृहीत धरुन एम.आय.डी.सी. करीता पार्कींग चे आरक्षण प्रस्तावित केले असावे या प्रमाणे शक्यता नमुद केलेली आहे.

मंजुर विकास योजनेतील प्रस्तुत पार्कींगचे आरक्षण हे राष्ट्रीय महामार्गाच्या सन्मुख नियोजीत आहे. तसेच अर्जदार यांनी निदर्शनास आणुन दिलेले एम.आय.डी.सी. क्षेत्रामधील ट्रक टर्मिनल्स हे सुमारे १ कि.मी. अंतरावर स्थित असणार आहे.

तरी अर्जदार यांची मागणी नुसार प्रस्तुत जमिनीवरील पार्कींगचे आरक्षण वगळुन आरक्षणाखालील जागा रहीवास विभागात समाविष्ठ करावयाची झाल्यास नियोजन प्राधिकरण या नात्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करावी लागेल.

तरी उक्त जमिनीवरील १८ मी. रुंद विकास योजना रस्त्याखालील जागेच्या आरक्षणाच्या स्थितीत व संरेखनात कोणताही बदल न करता अर्जदार यांची मागणी नुसार प्रस्तुत जमिनीवरील पार्कींगचे आरक्षण वगळुन आरक्षणाखालील जागा रहीवास विभागात समाविष्ठ करावयाची झाल्यास अथवा लगत असलेल्या औदयोगिक विभागामध्येच स्थित ठेवणे इ. प्रमाणे फेरबदलास मान्यता करीता मा.राज्य शासनास प्रस्ताव सादर करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३१** **(महासभा)**

**विषय क्र.:- १९** **प्रशासक ठराव क्र :-२२९** **दिनांक :-१५/०१/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१७९०/२०२४-२०२५ दि.१४/०१/२०२५
३. प्रकल्प अभियंता यांचा दि.१८/११/२०२४ चा अभिप्राय
४. शहर अभियंता यांचा दि.१८/११/२०२४ चा अभिप्राय
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.२७/११/२०२४ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.२७/११/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका १७ मजली प्रशासकीय इमारतीत व इतर मनपा मालकीच्या मिळकतींच्या ठिकाणी सुरक्षारक्षक पुरविणेसाठी अभिकर्ता नियुक्तीची ई निविदा प्रसिध्द करण्यास व सदयास्थितीतील मक्त्यास पूर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका १७ मजली प्रशासकीय इमारतीत व इतर मनपा मालकीच्या मिळकतींच्या ठिकाणी सुरक्षारक्षक पुरविणे कामास आयुक्त यांनी दि.०९/०६/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार मक्तेदार सन्वी मल्टी सर्व्हिसेस यांना पत्र क्रं.पवडी ३४६ दि.३०/११/२०२३ अन्वये २८ सुरक्षा रक्षक व रॅपीड सिक्युरिटी & लेबर सर्व्हिसेस जळगांव यांना पत्र क्रं.पवडी ३४५ दि.३०/११/२०२३ अन्वये २८ सुरक्षा रक्षक पुरविण्याचे कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे. त्यानुसार सदर कामाची मुदत दि.०१/१२/२०२३ पासुन दि.३१/११/२०२४ अखेर पावेतो ०१ वर्षासाठी देण्यात आलेली आहे. त्यानुसार दोन्ही मक्तेदार यांनी दि.०१/१२/२०२३ पासुन कामास सुरुवात केली आहे. सदर कामाची मुदत दि.३१/११/२०२४ रोजी संपत असल्याने आयुक्त यांच्या कडील आदेश क्रं.जा.क्रं./आ.का/८८९/२०२३-२४ दि.२१/०६/२०२४ च्या आदेशान्वये ज्या विभागातील निविदांची मुदत संपलेली आहे किंवा पुढील काळात संपणार असल्यास सदर निविदेची प्रक्रिया सुरु करावी असे सुचित आहे. त्यानुसार उक्त कामाची नव्याने पुढील वर्षाकरीता ई निविदा प्रसिध्द करणे आवश्यक आहे. सदर निविदेत खालील प्रमाणे मनपा मालकीच्या जागेवर सुरक्षा रक्षक नियुक्त करावयाचे आहेत.

तक्ता - अ

| अ.नं. | कामाचे ठिकाणी | सुरक्षा रक्षक संख्या | मंजुर दर | एका महिन्याकरीता एकुण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | १७ मजली प्रशासकीय इमारत, नविपेठ | ०५ | १९६०९/- | ९८०४५/- |
| २ | आयुक्त निवासस्थान शिवाजी नगर | ०६ | १९६०९/ | ११७६५४/- |
| ३ | आव्हाने शिवार गट नं.८६४ कचरा डेपो | ०५ | १९६०९/ | ९८०४५/- |
| ४ | टि.बी.एस.हॉस्पीटल वाहनतळ (आरोग्य विभाग) | १५ | १९६०९/ | २९४१३५/- |
| ५ | जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्रं.०२ कार्यालय लाठी शाळा | ०२ | १९६०९/ | ३९२१८/- |
| ६ | MIDC भागात डिझेल पंप, मनपा | ०३ | १९६०९/ | ५८८२७/- |
| ७ | वाघुर अशुध्द उपसा पाणी पंप घर रायपुर | ०६ | १९६०९/ | ११७६५४/- |
| ८ | गेंदालाल मिल फायर ऑफिस जवळ पा.पु.ऑफिस गोडावून (पा.पु.विभाग) | ०२ | १९६०९/ | ३९२१८/- |
| ९ | उमाळा जलशुध्दी केंद्र (पा.पु.विभाग) | ०६ | १९६०९/ | ११७६५४/- |
| १० | मनपा मालकीचे बहिणाबाई उदयान येथे (क.अभियंता यांच्या मागणीनुसार) सार्व.बांधकाम विभाग | ०३ | १९६०९/ | ५८८२७/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | मनपा मालकीचे अहिल्याबाई होळकर उदयान येथे (क.अभियंता मागणीनुसार) सार्व.बांधकाम विभाग | ०३ | १९६०९/ | ५८८२७/- |
| | एकुण :- | ५६ | १९६०९/ | १०९८१०४/- |

तक्ता - ब

| अ.नं. | कामाचे ठिकाणी | सुरक्षा रक्षक संख्या | मंजुर दर | एका महिन्याकरीता एकुण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | रिपोर्टानुसार २७ शाळांच्या १९ इमारतीमध्ये १० महिला व ०९ पुरुष सुरक्षा रक्षक प्रति दिवसाला ०१ या प्रमाणे एकुण १९ सुरक्षा रक्षक (प्रशासन अधिकारी व उपायुक्त मनपा शिक्षण विभाग जळगांव यांच्या कडील दि.२८/०८/२०२४ मागणी रिपोर्टानुसार २७ शाळांच्या १९ इमारतीमध्ये १० महिला व ०९ पुरुष सुरक्षा रक्षक प्रति दिवसाला ०१ या प्रमाणे सुरक्षा रक्षक नियुक्त करावेत याबाबत सुचित केलेले आहे त्यानुसार | १९ | १९६०९/- | ३७२५७१/- |
| २ | जळगांव शहर महानगरपालिका जळगांव साने गुरुजी ग्रंथालय येथे (ग्रंथालयाचे इमारतीचे पहिल्या टप्प्याचे काम सुरु असुन खिडक्या काढलेल्या आहे त्यामुळे ग्रंथालयाचे फर्निचर साहित्य कपाट खुर्ची लाकडी मोठे टेबल लाकडी कपाट ई साहित्य चोरी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यासाठी) | ०३ | १९६०९/ | ५८८२७/- |
| ३ | प्रशासकीय इमारत मजला क्रं.०४ अ विंग येथे (मतदान यंत्र ठेवण्यात आलेले असल्याने त्या गोडावून करीता २४ तास चोख सुरक्षा व्यवस्थेसाठी तात्काळ सुरक्षा रक्षक नियुक्त करावेत याबाबत सुचित केलेले आहे त्यानुसार) | ०३ | १९६०९/ | ५८८२७/- |
| ४ | जळगांव शहर महानगरपालिका मालकीची सि.स.नं.२१८३ (जुनी नगरपालिकेची जागा) वाहनतळ येथे (कार्यकारी कर अधिक्षक किरकोळ वसुली विभाग जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांच्या कडील दि.०८/०८/२०२४ रोजीचे प्राप्त पत्रानुसार त्यांनी जळगांव शहर महानगरपिलका मालकीची सि.स.नं.२१८३ (जुनी नगरपालिकेची जागा) वाहनतळ येथे ०१ सिक्युरिटी गार्डची मागणी केली आहे त्यानुसार) | ०१ | १९६०९/ | १९६०९/ |
| ५ | शहरातील खान्देश मील कॉलनी मधील मनपा क्वॉर्टर येथे (कनिष्ठ अभियंता यांनी केलेल्या मागणीनुसार शहरातील खान्देश मील कॉलनी मधील मनपा क्वॉर्टर येथे उपायुक्त श्रीमती निर्मला गायकवाड मॅम रहीवासास येणार असल्याने येथे) | ०३ | १९६०९/ | ५८८२७/- |
| | एकुण :- | २९ | १९६०९/ | ५६८६६१/- |

वरील प्रमाणे ११ ठिकाणी सुरक्षा व्यवस्था पुरविणेसाठी दर मागविणेकामी ई निविदा प्रसिध्द करणेस मान्यतेसाठी व सदरची ई निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यास व पर्यायी खर्चास मान्यता मिळण्यासाठी दि.०९/०८/२०२४ रोजी स्थायी समिती/प्रशासक यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव ठेवला असता, चर्चेअंती सदर कामी मनुष्यबळ पुरवठा हा आस्थापना विभागामार्फत करण्याचे निर्देश दिले होते तदनंतर आस्थापना विभागाकडुन कार्यवाही न झाल्याने पुन्हा पुनश्च प्रकरणी विभागांनी कार्यवाही करावी असे निर्देश झाल्याने निविदा कार्यवाहीसाठी मुदत संपल्यापासुन दि.३०/११/२०२४ ते फेब्रुवारी २०२५ अखेर पूर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ देणेस व पर्यायी खर्चास, तसेच वरील तक्ता- अ मधील ०१ ते ११ ठिकाणी व तक्ता- ब मधिल ०१ ते ०५ ठिकाणी असे एकुण १६ मनपा मालकीच्या जागेवर / मिळकतीवर सुरक्षा रक्षक पुरविण्यासाठी ई निविदा प्रसिध्द करणेस मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**